# प्रकरण १

# स्त्रीवाद म्हणजे काय ?

## स्त्री म्हणजे काय ? :-

'स्त्री' म्हणजे नक्की काय ? हा अजूनही एक प्रश्नच आहे. कारण, गेल्या शतकातील लिहील्या गेलेल्या साहित्याने सुद्धा 'स्त्री' या शब्दाची पूर्णत: व योग्य अशी स्पष्ट उकलच केलेली नाही. 'स्त्री' हा एक प्रश्न असेल तर मग त्याचे नक्की स्वरुप काय असावे ? 'स्त्री' ही अशी काही वेगळी चीजवस्तू आहे काय ? का 'स्त्रीत्त्व' ही एक खास अनुभूती आहे का केवळ स्त्रीचे शरीर मिळाले म्हणून ती 'स्त्री' मानली जावी का?

'स्त्री' चे स्त्रीपण केवळ बाह्यांगावर अवलंबून नसेल आणि तिचे स्त्रीपण म्हणून खास अस्तित्त्व जर आपण कबूल करत असू तर 'स्त्री' ची व्याख्या करणे आपल्याला गरजेचे आहे.

'स्त्री' ही भावनाप्रधान, विकारी आणि नाजूक अशी एक पारंपरिक समजूत आहे. शरणवृत्ती, याचकता, निष्क्रियता, परावलंबित्व, सहनशीलता, नाजूकपणा, हळुवारपणा, सुरेलपणा, संथपणा, नम्रता, मूकपणा व धार्मिकतेचे मूर्तिमंत, जिवंत, जाज्वल्य उदाहरण म्हणजे 'स्त्री' असे भाषेतून अविष्कृत होणारे स्त्रीरुप आहे.

## स्त्री व पुरुष :-

'स्त्री' म्हणजे जिच्या शरीरात गर्भाशय आणि रज:पिंड असतात. 'स्त्री' व पुरुषा' च्या "X+X" गुणसूत्राच्या मिलनातून मुलगी जन्माला येते व ही मुलगीच पुन्हा 'स्त्री' बनते. ही 'स्त्री' ची शास्त्रीय दृष्टीकोनातून केलेली परिभाषा होय. तर 'स्त्री' व 'पुरुषाच्या' "X+Y" या गुणसूत्राच्या मिलनातून पुरुष बीज जन्माला येते म्हणजेच पुरुष जन्मासाठी सुद्धा स्त्रीची आवश्यकता असते. 'स्त्री' व 'पुरुष' यांच्या शिवाय सृजनशीलता नाहीच.

'स्त्री' महत्त्वाची की 'पुरुष' महत्त्वाचा ? हा वाद येथे नसून 'स्त्री' शिवाय 'पुरुष' हा अपूर्ण आहे. मग जर सृजनशीलतेसाठी दोघेही समान असतील तर मग 'स्त्री' ही का दुय्यम मानली जाते ? पुरुष हा तिच्या पेक्षा का श्रेष्ठ गणला जातो ? आणि मगच ज्यावेळेला

स्त्रीला सर्वच पातळ्यांवर कमी लेखले जावून दुय्यम स्थान दिले जाते तेव्हा तो विषय स्त्रीवादाकडे झुकतो.

'स्त्री' व 'पुरुष' हे भाषेच्या दृष्टीने दोन विरुद्ध अर्थाचे शब्द समजले जात असले तरी त्यामधील नातेसंबंध हे मात्र एकमेकांवर अवलंबून असतात. 'स्त्री' या शब्दांने मानव जातीचा निम्मा भागच लक्षात घेतला जातो. 'माणूस' या शब्दाला मात्र फारच व्यापक अर्थ आहे. मनुष्य जामातीचे दोन गट निर्सगानेच निर्माण केलेले आहेत आणि ते म्हणजे एक स्त्रियांचा व दुसरा पुरुषांचा. त्यामधून केवळ पुरुष नव्हे तर संपूर्ण मानव जातच दर्शविण्यासाठी वापरला जातो. 'स्त्री' सुद्धा एक माणूसच आहे आणि ती माणूस म्हणूनच जगणार आहे. हा विचार आज सुशिक्षित स्त्रियांच्यामध्ये व अंशत: पुरुष जातीमध्येही दिसून येत आहे.

## स्त्रीचे समाजातील दुय्यम स्थान :-

समाजाने स्त्रीला दुय्यम स्थान दिले आहे असे का ? स्त्रीचे संसारातील नेमके स्थान कोणते ? ती पतीची प्रिय सखी आहे की केवळ शोभेची वस्तू ? स्त्रियांच्या बाबत समाज नेमकी कोणती भूमिका घेतो ? एकतर तो तिला देवी, माता, पतिव्रता म्हणून गौरवितो अन्यथा वेश्या, कुलटा म्हणून वाळीत टाकतो. तिचा नवरा जिवंत असेल तर तिला सवाष्ण मानतो व तिच्या दुर्दैवाने तिचा नवरा तिच्या आधी मेला तर तिला विधवा किंवा रांड मानून तिचे तोंड पहाणे हा अपशकुन मानतो. समाजाने निर्माण केलेल्या चौकटीतच तिने रहावे. तिच्या स्त्रीत्त्वाच्या मर्यादा तिने ओलांडू नयेत. प्रसंगी तिचे 'स्त्रीत्त्व' व 'मनुष्यत्त्व' तिने स्वत:च समाजासाठी दडपवून टाकावे अशी अपेक्षा समाज करतो. आणि मग या सर्वांची वैचारिक जाण आणि भान असणारी स्त्री स्वत:लाच प्रश्न विचारते. 'हे असे का?' तेव्हा 'आत्म' किंवा 'स्व' ची प्रखरतेने जाणीव जन्माला येते. तेथेच 'स्त्रीवादाचा' जन्म होतो.

## स्त्रीवाद :-

स्त्रीवादाबद्दल समाजाने आपापल्या समजूतीप्रमाणे अनेक समज-गैरसमज निर्माण करुन घेतले आहेत. 'स्त्रीवाद' म्हणजे एकंदरीत पुरुषजातीच्या विरोधातील उचललेले पाऊल असा ही एक गैरसमज समाजात रुजला गेला. 'स्त्रीवाद' म्हणजे बहुतांशी स्त्रियांनी कोणत्याना कोणत्या कारणांनी घराबाहेर पडणं, स्त्रीवादी बायका म्हणजे स्वैराचारी, स्वतंत्रता मानणाऱ्या, विवाहाची बंधने न मानणाऱ्या, स्वत:च्या पतीस सोडून परक्या पुरुषासमवेत रमणाऱ्या किंवा राहणाऱ्या, वैवाहिक जीवनात असामाधानी असणाऱ्या, पुरुषी वागणाऱ्या, पुरुषांप्रमाणे हक्क मागणाऱ्या, नटणाऱ्या-थटणाऱ्या, व्यासपीठावर स्त्रीमुक्तीचे विचार मांडणाऱ्या, वर्तमानपत्रातील स्तंभालेखनापासून ते साहित्य प्रांगणातून स्वविचार मांडणाऱ्या, पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करणाऱ्या स्त्रिया या स्त्रीवादी असं केवळ सुशिक्षित पुरुषानांच वाटत नाही तर काही अंशी सुशिक्षित स्त्रियांना देखील हेच वाटतं. म्हणूनच पुन्हा मनामध्ये असा विचार डोकावतो की, 'स्त्रीवाद', 'स्त्रीवाद' म्हणतात ते म्हणजे नेमके काय ? या 'स्त्रीवादाची' नेमकी भूमिका काय? मग असे वाटू लागते की, स्त्रीवादाची पाश्चात्त्य पार्श्वभूमी, भारतीय वातावरणातील स्त्रीवाद, मराठीतील स्त्रीवाद हे जाणून घेण्याची निश्चितच आवश्यकता आहे.

## स्त्रीमुक्ती : एक चळवळ :-

'स्त्रीवाद' ही कल्पना मुळातच पाश्चात्त्य असून अमेरिकेतून ती आपल्याकडे आलेली आहे. अमेरिकेमध्ये १९७५ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय स्त्रीमुक्ती वर्ष' मानले गेले होते, तसेच १९७५ ते १९८५ पर्यंतचे दशक हे 'स्त्रीमुक्ती' चे म्हणून युनोने जाहीर केले होते. आणि तेथूनच स्त्रीजातीच्या निरनिराळ्या प्रश्नांनाच एक उठाव मिळाला. बदलत्या परिस्थितीनुसार स्त्रियांच्या परिस्थिती मध्ये ही बदल घडून येवू लागले. स्त्रीमुक्तीच्या छोट्या-मोठ्या चळवळी निरनिराळ्या देशातून निर्माण झाल्या व स्त्रियांच्या हक्काविषयी तसेच अधिकारांविषयी

समाजात जागृती निर्माण करण्याचे प्रयत्न झाले. स्त्रीला एक व्यक्ती म्हणून पुरुषाच्या बरोबरीने समानतेने वागविले पाहिजे. अशा विचारातून स्त्रीमुक्ती चळवळीचा पाया रोवला गेला. १९६० नंतर 'स्त्रीवाद' ही संकल्पना जरी वेगाने पुढे आली असली तरी त्यात अभिप्रेत असलेला 'स्त्री-पुरुष समानतेचा' विचार गेल्या अनेक वर्षापासून हळूहळू उत्क्रांत होत आलेला आहे.

## स्त्रीवादाची वाटचाल :-

फ्रेंच राज्यक्रांतीमुळे स्वातंत्र्य आणि समता या मूल्यांना उठाव मिळाला. तसेच १७८९ चा मानवी हक्कांचा जाहीरनामा स्त्रीवादी विचारांना प्रेरक ठरला. इंग्लंड मध्ये मेरी वुलस्टन क्रॉफ्ट (१७५९ ते १७९७) हिने 'Thoughts on the Education of Daughters' (१७८७) आणि "A Vindication of the Rights of Woman" (१७९२) अशी दोन पुस्तके लिहून, त्याचप्रमाणे Mary : A Fiction (१७८८) ही कादंबरी लिहून शैक्षणिक आणि सामाजिक पातळ्यांवर स्त्री-पुरुष समतेच्या तत्त्वाचे प्रतिपादन अत्यंत कळकळीने केले आहे.'' 'स्त्रीवाद' या विषयाला वाहिलेली पुरुषांची पुस्तके स्त्रियांना माणूस न मानता बाई बनविण्यासाठी, बायकांना प्रेमळ पत्नी आणि समंजस आई यापेक्षा मोहक, मादक रखेल बनविण्यावर भर देतात,'' असे मत वुलस्टनक्राफ्ट हीने मांडले आहे.[१] १८४० साली अमेरिकेत वंशभेद नष्ट करण्याची व कृष्णवर्णीय पुरुषांना मतदानाचा अधिकार प्राप्त करण्यासाठी चळवळ सुरु झाली. त्यामध्ये बऱ्याचशा मध्यमवर्गीय गोऱ्या स्त्रियांनी भाग घेण्यास सुरुवात केली त्यातून त्यांना स्वतःच्या दुय्यमपणाची व लोकशाही प्रक्रियेपासून वंचित असल्याची जाणीव झाली. १८४८ मध्ये अमेरिकेतील गुलामगिरी विरुद्धच्या लढ्यात सहभाग घेतलेल्या स्त्रियांनी स्त्रियांच्या हक्कांचा जाहिरनामा घोषित करून मालमत्तेत समान वाटा, शिक्षण व रोजगाराच्या समानसंधीची मागणी केली. १८९० मध्ये स्त्रियांची झालेली 'सफ्रेजेट' चळवळ हा याच तत्त्वाचा अविष्कार होता. ही चळवळ पाश्चात्त्य जगात प्रामुख्याने अमेरिका व इंग्लंड या

देशात एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात सुरु झाली. १९२० मध्ये अमेरिकन राज्यघटनेमध्ये १९ वी दुरुस्ती होऊन स्त्रियांना मताधिकार मिळाला. इंग्लंडमध्ये समानवेतनाची शिफारस एका रॉयल कमिशनने १९४६ मध्ये केलेली होती. पण या सर्वांचे फळ १९७० साली मिळाले.

१७ व्या शतकपूर्तीनंतर व २० व्या शतकाच्या सुरवातीपूर्वी सुरु झालेल्या प्रबोधन चळवळीत स्त्रियांचे स्वातंत्र्य, त्यांचे शिक्षण, त्यांचे स्वत:चे असे खास प्रश्न, पुरुषप्रधान समाजव्यवस्थेपासून त्यांना हवी असणारी मुक्ती, त्यांचा सामाजिक, सांस्कृतिक प्रक्रियेतील सहभाग हा या विषयीच्या विचारसरणीचे फलित होते. अशाप्रकारे उदारमतवादी विचारांनी स्त्रीवादी विचारांचा पाया उभारायला व भक्कम करण्याला सुरुवात केली होती. त्यामुळे २० व्या शतकातील स्त्रीवादी विचारसरणीची पाळेमुळे येथेच रुजली गेली आहेत. दुसऱ्या महायुद्धानंतर स्त्रीवादी विचारांना खूपच गती मिळाली आणि विशेष करुन साहित्याच्या व समीक्षेच्या क्षेत्रात स्त्रीवादी विचारसरणी फोफावली. अमेरिकेमध्ये १९७० च्या सुमारास स्त्रीविषयक अभ्यासाला व संशोधनाला शैक्षणिक क्षेत्रात स्वतंत्र असा दर्जा व स्थान प्राप्त झाले. या सर्व बाबतीत अमेरिकन स्त्रियांना आपण नशिबवान मानतो, पण तिथं पर्यंत पोहचण्यासाठी म्हणजेच मानव म्हणून आपले हक्क मिळविण्यासाठी, मतांचा व मिळकतीवर हक्क मिळविण्यासाठी त्यांना जास्तीत जास्त लढा द्यावा लागला. अशा प्रबोधनचळवळीतून व स्त्रीमुक्ती चळवळीतून स्त्रीवादी विचारसरणीला वैचारिक पद्धतीचे अधिष्ठान प्राप्त झाले.

'दुसऱ्या महायुद्धानंतर पुरोगामी चळवळी पश्चिमी देशात जोमाने सुरु झाल्या. या काळात स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाची दखल घेऊन स्त्रियांचे प्रश्न सोडविण्यासाठी संघटित प्रयत्न सुरु झाले. त्यास चळवळीचे स्वरुप प्राप्त झाले. या चळवळीच्या माध्यमातून जो विचार पुढे आला त्यास 'स्त्रीमुक्तीवाद' असे म्हटले जाते.'[२] याच स्त्रीमुक्तीवादाची नेमकी संकल्पना 'स्त्री–जीवनाची गुंतागुंत' या अभ्यासपुस्तिकेत मांडली आहे ती अशी की, 'अमेरिका, जपान आणि युरोपातील अनेक देशांमध्ये १९६२ नंतर आधुनिक काळातील स्त्री–

प्रश्नांसंबंधी चळवळ सुरु झाली. या चळवळीतं मांडल्या गेलेल्या विचारांना 'स्त्रीवाद' किंवा 'स्त्रीमुक्ती वाद' असं नाव पडलं. प्रारंभी युरोपातील नवडाव्या विचारांपासून बाजूला झालेल्या जहाल राजकीय विचारांच्या स्त्रियांना स्त्रीवादी म्हटलं गेलं, पण पुढे स्त्रियांच्या मुक्तिच्या चळवळीलाच हे नाव पडलं......'[३]

'स्त्रीवाद' समजून घेण्यासाठी समाजामध्ये स्त्रीला दिली जाणारी दुजाभावाची वागणूक, तिचे दुय्यम स्थान, तिला कमी लेखण्यामागील भूमिका या गोष्टी जाणून घेणे. अत्यंत गरजेचे आहे. स्त्रियांच्या मनात पिढ्यांन्पिढ्या असे कुठे तरी मूळ धरुन राहिलेले आहे की आपण स्त्री आहोत आणि स्त्री म्हटले म्हणजे आपल्यात काही न्यूनत्त्व आहे आणि समाजानेच आपल्याला हे दुय्यम स्थान बहाल केलेले आहे. स्वत:ला कमी न लेखता दुय्यमत्व नाकारणं ही स्त्रीवादाकडे नेणारी पहिली पायरी आहे. लिंगभेद वगळता स्त्रीच्या अंगामध्ये असलेल्या क्षमता या पुरुषांच्या क्षमतेइतक्याच ताकदीच्या आहेत. स्त्री सुद्धा पुरुषा इतकीच समाजातील महत्त्वाचा घटक आहे. हे तत्त्व स्त्रीने प्रथमत: स्वत: मनावरती बिंबवून रुजवायलाच हवे. परंतु पुरुषसत्ताक पद्धती मानणारा समाज स्त्रीकडे केवळ एक व्यक्ती, एक माणूस म्हणून, एक 'मादी' म्हणून पाहतो म्हणूनच सिमॉन द बोव्हा म्हणते की, ''स्त्री जन्मत नाही ती घडविली जाते.''[४] या संदर्भात बोव्हाला 'बाईपण' अभिप्रेत आहे. 'स्त्री' ही शारीरिकदृष्ट्या पुरुषाहून भिन्न आहे. परंतु या शारीरिक भिन्नतेला स्त्रीचा दुबळेपणा समजणे वा या व्याख्येनुसार स्त्रीपणाचे 'बाईपण' अधोरेखित करणारे साचे बनविणे हे काम पितृसत्ताक पुरुषकेंद्री व्यवस्थेचे आहेत. हे लिंगभान (Gender) मग स्त्रीचे भागधेय बनते म्हणूनच बोव्हा म्हणते की, "A Woman is not born, she is made" किंवा "One is not born, but rather becomes a woman."[५]

असेल त्यात समाधान मानणारी स्त्रीची वृत्ती ही स्त्रीला जीवन जगण्यासाठी जितकी पूरक आहे तितकीच मारक आहे त्यामुळे तिने,

"ठेविले अनंते । तैसेचि रहावे ।।

चित्ती असू द्यावे । समाधान ।।"

(रामदास स्वामी)

अशी अपुरी भावना मनामध्ये न ठेवता ती मुळापासून उपटून टाकायला हवी. आपण स्वतंत्रपणे जगलो, वागलो तर पुढे काय ? अशी मनामध्ये दडून राहिलेली अनामिक भिती, न्यूनगंड, असुरक्षिततेची भावना तिने झटकून टाकायला हवी. 'स्वतंत्र' म्हणजे स्व-तंत्र, स्वत:च्या तंत्राप्रमाणे जगण्याची मानसिकता, परावलंबीत्व मान्य करुन जगण्यातील फोलपणा तिला कळायला हवा.

"पिता रक्षति कौमारे भर्ता रक्षति यौवने ।

रक्षन्ति स्थाविरे पुत्रा : न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ।।"[६]

– मनुस्मृती

मनूने 'मनुस्मृती' मध्ये असे म्हटलेले आहे आणि समाजाच्या मनावरही ते पूर्णपणे बिंबले गेलेले आहे. स्त्रीची प्रतिमा ही बाल्य-तारूण्य-वार्धक्य यामध्ये पिता-पती आणि पुत्र यांच्यावरतीच पूर्णपणे अवलंबून असलेली दाखविण्यात आली आहे. स्त्रीला स्वातंत्र्य देवू नये असे मनूने त्यामध्ये म्हटले आहे. म्हणजेच स्त्रीच्या स्वातंत्र्यावर गदा आणून तिला परावलंबी बनवून दुय्यमत्व देवून कमकुवत बनविले आहे. 'स्त्री' ही स्वतंत्र व्यक्ती आहे. तेला ही स्वतंत्र अस्तित्त्व आहे. पण समाजाने ठरविल्याप्रमाणे तिला नेहमीच कोणा ना कोणावर तरी अवलंबून रहावे लागते. याबाबतीत रवींद्रनाथ टागोर म्हणतात की, 'निसर्गामध्ये काही अवलंबन असतात.'[७] पण निसर्गाचा हा न्याय काय फक्त स्त्रीलाच लागू होतो का ? तसेच ते म्हणतात की, 'जी स्त्री गृहिणी असते. ती उदरनिर्वाहासाठी पतीवर अवलंबून राहतेच.' पण घर, संसार हा काय फक्त स्त्रीचाच असतो ? मुलं काय फक्त तिची असतात ? पतीलाही घर, संसार हवाच असतो ना...., मुलं हवीच असतात ना...., पत्नीचे जे सासू-सासरे

असतात ते कोण असतात? पतीचे आईवडिलच तर असतात, मग ते त्याला नको असतात का ? जर हे सगळं पतीला हवं असेल तर घर सांभाळण्यासाठी, मुलांच्या संगोपनासाठी, आई-वडिलांच्या देखभालीसाठी पतीही पूर्णत: पत्नीवर अवलंबूनच असतो.... अवलंबित्व काय फक्त आर्थिकच असतं ? तसं पाहिले तर दोघेही भावनिक दृष्ट्या एकमेंकावर अवलंबून असतात.

स्त्रीवाद म्हणजे कुटुंबाला, मातृत्वाला विरोध किंवा मंगळसूत्र-कुंकवाला नकार असे नाही. ज्या स्त्रीला फक्त गृहिणी होण्यातच स्वारस्य आहे. जिला घरकामाचीच आवड आहे तिला स्त्रीवाद कमी लेखत नाही. घरकामाचं महत्त्व आणि त्याचं मोल समाजानं मान्य केलं पाहिजे. 'स्त्रीवाद' म्हणजे सर्व स्त्रियांनी घरा-बाहेर पडणं असे नाही, तर ज्या स्त्रीला घरच सांभाळायचं आहे तीही स्त्रीवादी असू शकते. तसेच स्त्रीला मूल होऊ न देण्याचा अधिकार असला पाहिजे. पण तो तिचा स्वत:चा निर्णय असला पाहिजे. आपल्या सोयी स्वार्थासाठी पुरुषांनी, पुरुषप्रधान समाजानं स्त्रीला इतकं दडपणाखाली ठेवलं की, दडपणाखालचं आयुष्य हेच स्त्रीचे नैसर्गिक आयुष्य आहे असं स्त्रियांनाही वाटू लागलं. हे दडपण, बंधन तसेच दुय्यमत्व हे सुरक्षित वाटणं ही पुरुष-वर्गाने स्त्रियांची केलेली कोंडी आहे.

'स्त्रीवाद' म्हणजे पुरुषांना विरोध असे नाही. विरोध हा आहे पण कोणाला तर जो स्त्रियांना कमी लेखतो, स्त्रियांना उपभोग्य वस्तूचा दर्जा देतो अशा पितृसत्ताक व्यवस्थेला, पुरुषीवर्चस्वाला, पुरुषी प्रवृत्तीला आहे. डॉ. अश्विनी धोंगडे म्हणतात, '' 'स्त्रीवाद' म्हणजे पुरुषांपासून फारकत घेऊन स्वत:चा सवता सुभा निर्माण करणे नव्हे, पण संस्कृतीच्या हजारो वर्षांच्या इतिहासाने बाईचे मानवपण नाकारून तिला जी पशूतुल्य अवस्था प्राप्त करुन दिली, त्यातून बाहेर पडून आपले हक्क प्रस्थापित करुन घेण्यासाठी निर्माण केलेले हे व्यासपीठ आहे. ज्यावेळी 'स्त्री' ही खुलेपणाने श्वास घेऊन पुरुषाइतकेच स्वतंत्र जीवन जगू शकेल त्यावेळी स्त्रीवादाची गरज भासणार नाही.''[८]

डॉ. मंगला वरखेडे आपल्या एका लेखात म्हणतात की, '' 'स्त्रीवादी' ही राजकीय विचार प्रणाली आहे. 'मानवी संबंध' व्यवस्थेचा मूळापासून वेध घेणारे एक विचार प्रणाली

आहे. ही प्रणाली एकरेषीय नसून ती अनेक विचार प्रवाहांना सामावून घेणारे हे बृहतवर्तुळ आहे. स्पर्धेपेक्षा सहकार्यावर भर देणाऱ्या मवाळ स्त्रीवादापासून (Victim Feminism) पुरुष सत्तेचा पाया उखडून टाकण्याची भाषा करणाऱ्या जहाल स्त्रीशक्ती वादापर्यंत अनेक भूमिकांचा विचार या प्रणालीत एकत्रितपणे केला जातो. दुसऱ्याच्या आनंदात आनंद मानणारी तसेच अपत्यनिर्मिती हे स्त्रीच्या गुलामीचे कारण नसून ते स्त्रीत्त्वाच्या श्रेष्ठत्वाचे लक्षण आहे. अशी भूमिका घेऊन शांततामय सहजीवनाचा पुरस्कार करणारी आत्मसमर्पणवादी मवाळ मांडणी हे स्त्रीवादाचे एक टोक आहे.''[१]

'स्वत:ला केवळ कुटुंबासाठी राबण्याचे साधन मानणे' अशी जणू मानसिकताच झालेली आहे. त्यामुळे संसाराच्या गाड्यात तिला अडकविण्यात आले. तिने याला नकार देऊ नये म्हणून हे काम करण्याचे सामर्थ्य केवळ तुझ्याकडेच आहे असा तिचा गौरव ही केला जाऊ लागला. आपले शोषण होत आहे याची जाणीव होणार नाही ही खबरदारी पुरुषांनी घेतली. स्त्रीत्त्वाविषयीच्या या पुरुषी कल्पनांच्या सततच्या माऱ्यामुळे हे गुण आपल्यात उपजतच आहेत असे तिलाही वाटत आले. त्यातून तिच्या क्षमता, प्रेरणा, भावना, वासना, विचार, शक्ती दाबून टाकण्यात आल्या. तिची विचारशक्ती हिरावून घेतली गेली. अशीच काहीशी स्त्रीत्त्वाबद्दलची भूमिका ॲरिस्टॉटलनी मांडली. ते म्हणतात की 'पुरुषाशी तुलना करता स्त्रीमध्ये जे न्यून असते. त्यातच तिचे स्त्रीत्त्व असते' पुरुषांच्या तुलनेत स्त्रीमध्ये गुणधर्माचा अभाव असतो. हे पुरुषप्रधान विचारचौकटीचे प्रमुख प्रमेय आहे. स्त्रीची व्याख्याच मुळी ते अनेकदा न्यूनाच्या व अभावाच्या आधारे करताना आढळतात. ही प्रक्रिया वर्षानुवर्षे सर्वत्र चालत आलेली आहे. परंतु स्वभान आलेली स्त्री या प्रक्रियेचा विचार आपल्या परीने करताना दिसते. कुटुंबासाठी खस्ता खाणारी स्त्री जेव्हा स्वत:च्या आयुष्याचा विचार करू लागते तेव्हा ती प्राप्त परिस्थितीला नकार देते. कुटुंबामध्ये, समाजव्यवस्थेमध्ये आपले शोषण होते आहे. आपल्या भावनांकडे, गरजांकडे दुर्लक्ष केले जाते आहे हे जाणणारी स्त्री २० व्या शतकाच्या पूर्वार्धात मोकळेपणाने वापरू लागते तेव्हा खऱ्या अर्थाने स्त्रीत्त्वाची जाणीव होते.

स्त्रीला आपल्या स्त्रीत्त्वाची जाणीव होणे, तिला आपल्या व्यक्तिमत्वाचा अर्थ कळणे, तिला तिच्या अस्मितेचा सार्थ अभिमान वाटणे, तिला तिच्या माणूसपणाबद्दल आत्मियता वाटणे, तिला तिचे हक्क अधिकार कळणे, तिला तिच्या अवमूल्यनाची आणि शोषणाची जाणीव होणे, तिने आपल्या दडपल्या जाणाऱ्या स्वत्त्वासाठी संघर्षप्रवण होणे यालाच 'स्त्रीवाद' म्हणतात.

म्हणूनच स्त्रीवाद हा 'जाणीव जागृती' करून स्त्रियांना प्रश्न करतो की, 'स्त्रियांना समता आणि स्वातंत्र्य हवं आहे की नाही ? की दुय्यम पारंपरिक भूमिकेतले सारे फायदे मिळवत आणि तोट्यांबद्दल तक्रारी करत 'बिचाऱ्या आम्ही' अशीच भूमिका त्यांना साकरत राहायची आहे.'

याउलट स्त्रीशक्तीवादी स्त्रीवादाची भूमिका आहे. समर्थ व्यक्तीच समर्थ समाज निर्माण करु शकतात. ही भूमिका घेवून स्त्रियांनी आपल्या सामाजिक स्थानासाठी आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग अवलंबून समर्थ पर्याय स्वीकारावा. आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर सर्व प्रकारच्या पुरुषसत्ताक अवडंबरांना आव्हान द्यावे आणि शिक्षण, रोजगार, आरोग्य, राजकीय, सत्ता या सर्व क्षेत्रातल्या हक्कांसाठी संघर्ष करावा. स्त्रियांच्या वाट्याला आलेल्या दुय्यमत्त्वाला नकार देऊन स्त्रीशक्तीचे दर्शन घडविणारी संघर्षशील भूमिका हे स्त्रीशक्तीवादी स्त्रीवादाचे दुसरे टोक सांगता येईल.

## भाषिक पातळीवरील पुरुषी वर्चस्व :-

पुरुषाच्या तुलनेत स्त्रीला कमी लेखण्यासाठी तिला कधी नदीची उपमा दिली जाते तर पुरुषाला समुद्राची, पुरुष कधी आकाश, कधी सूर्य तर कधी दिवस असतो. आणि त्यातूनच भव्यता, कृतीशीलता, सामर्थ्य, दातृत्व, स्वंयभूपणा असे संकेत दर्शविले जातात. आणि त्या तुलनेत स्त्रीला मात्र पृथ्वी, चंद्र, रात्र अशी उपमा देवून तिच्यातील शरणागतवृत्ती, याचकता, निष्क्रियता, परावलंबित्व, सहनशीलता, दुबळी, नाजूक अशा अर्थाचे संकेत

दर्शविले जातात. अपूर्ण स्त्रीच्या स्वरुपात 'राधा' तर पूर्ण पुरुषाच्या स्वरुपात 'कृष्ण' दर्शविला जातो. 'वृक्ष' म्हणजे 'पुरुष' आणि त्याच्या आधाराने चढणारी 'वेल' म्हणजे 'स्त्री' या सर्व प्रतिमा स्त्रीच्या मनावर कायमच्या ठसविल्या जातात. या सर्व गोष्टीतून असेच स्पष्ट होते की, स्त्रीची भाषिक अभिव्यक्ती पुरुषांना अभिप्रेत स्वरुपात होते. स्त्री-पुरुष या विषमतेच्या तत्त्वावर उभारल्या गेलेल्या समाजव्यवस्थेत स्त्रीला नेहमी आणि कायमच पुरुषापेक्षा कमी दर्जाची,कमी बुद्धिमत्तेची मानली जाते. हे व या मागची सत्य परिस्थिती व त्यातील गमक हे स्त्रीला कळायलाच हवे.

तसेच भाषेच्या पातळीवरही पुरुषी वर्चस्व जागोजागी दिसते. इंग्लिशमध्ये 'Man' हा शब्द सर्रास 'Human Being' या अर्थाने वापरला जातो. 'the prehistoric man', 'The man in the street' यासारख्या वाक्प्रयोगातून हे स्पष्टच दिसते. मराठीत ही सर्व मानवांमध्ये 'बंधुभाव' किंवा 'Brotherhood' असायला हवा, असे आपण म्हणतो; 'भगिनीभाव' अशी संकल्पना कोणी मांडली तर तिची बहुदा टिंगलच होते. तसेच विवाहानंतर स्त्रीचे आडनावच नव्हे तर नावही बदलणे हे पुरुष स्त्रीवर स्वामित्वाधिकार किती सर्वंकष पद्धतीने गाजवितो, याचे ते एक विदारक उदाहरण आहे. तसेच आधुनिक समाजामध्ये स्त्रिया वेगवेगळ्या व्यवसायात उच्चपदावर असल्यातरी आजही. 'प्रा. सौ.', 'Prof. Mrs' किंवा 'डॉ. कु.' किंवा 'Dr. Miss' या प्रकारे स्त्रियांचा उल्लेख आढळतो. भाषेच्या वापरातून पुरुषप्रधानता दर्शविणारी अशी अनेक उदाहरणे स्त्रीवाद्यांनी शोधून काढलेली आहेत. इंग्लिशमध्ये स्त्रीच्या नावापूर्वी 'Miss' वा 'Mrs.' याऐवजी 'Ms' (उच्चार मिझ) असा वापर आज रुढ झालेला दिसतो तो त्यामुळेच. स्त्री व पुरुष दोघांनाही उद्देशून 'Chairman' किंवा 'Spokesman' हे शब्द वापरण्याऐवजी 'Chairperson' आणि 'Spokesperson' हे शब्द वापरावे किंवा स्त्री असेल तर 'Chairwoman' आणि 'Spokeswoman' म्हणावे असेही नवे संकेत रुढ होत आहेत.

'पुरुष' या शब्दाच्या उच्चारातून नर, नवरा, पुरुष–माणूस, मुलगा, मर्द, पती, धनी, मालक, वर आदी अर्थाची अभिव्यक्ती होते हे सर्व पर्यायी अर्थ नि संकेत पुरुषाचे श्रेष्ठत्व–सामर्थ्य–मोठेपण–स्वामीत्व स्पष्ट करणारे आहेत, तर 'स्त्री' या शब्दाच्या उच्चारातून अभिव्यक्त होणारे नारी, ललना, महिला, नार, मादी, अबला, बाईमाणूस, बायीबापडी, माहेरवाशीण, सासूरवाशीण, कन्या, आयाबाया, पत्नी, बायको अशा संकेतातून स्त्रियांचे दुय्यमत्त्व अधोरेखित होते.

स्त्रीवादाचा पुरुषकेंद्री भाषिक व्याकरणाला नकार देण्यावर भर आहे. समाजातील पुरुषप्रधानतेचा भाषेवर ही प्रभाव पडलेला दिसून येतो. ''भाषेबाहेर वास्तव नसते, किंबहुना भाषा हेच वास्तव असते.''[१०] असा सपिर वोर्फ यांचा सिद्धांत आहे. ज्याप्रमाणे इंग्रजी भाषेमध्ये पुरुषी वर्चस्वाच्या खाणाखुणा दिसून येतात. त्याचपद्धतीने मराठी भाषेमध्ये पण त्या जाणवतात. ज्या कोणत्याही निर्णयप्रकियेमध्ये अधिकाराचे मूल्य असते. ती निर्णयप्रक्रिया पुरुष किंवा माणूस हे गृहित धरुनच योजलो जाते. चेअरमन, राष्ट्रपती, सभापती इ. उच्चपदस्थ सामान्य नामे पुल्लिंगी आहेत. याचा प्रत्यय आपल्याला सध्याच्या असणाऱ्या 'राष्ट्रपती' 'मा. प्रतिभाताई पाटील' यांच्या बाबतीतही दिसून येतो. २००८ साली जेव्हा त्या राष्ट्रपती झाल्या तेव्हा त्यांना 'राष्ट्रपती' म्हणावे का ? असा प्रश्न निर्माण होऊन चर्चिला गेला. 'राष्ट्रपती' हा देशाचा प्रथम नागरीक असतो. 'राष्ट्रपती' या शब्दाची फोड राष्ट्र+पती म्हणजे 'राष्ट्राचा पती' अशी होय. मग मा. प्रतिभाताई पाटील या स्त्री असताना त्यांना राष्ट्राचा पती म्हणता येईल का? पती म्हणजे स्वामी, धनी, नवरा यावरुन 'राष्ट्रपती' हे सामान्य नाम पुल्लिंगी आहे. पण हे जसे पुरुषवाचक आहे तसेच ते 'कर्तृत्ववाचक' सुद्धा आहे. आणि कर्तृत्व हे कधीच लिंगाप्रमाणे बदलत नाही. मा. प्रतिभाताई पाटील जरी स्त्री असल्या तरी त्यांच्याकडे ती क्षमता आहे. म्हणूनच त्या या उच्चपदापर्यंत पोहचल्या.

पाश्चात्त्य देशात राष्ट्रपती पद भूषविणारी व्यक्ती स्त्री असो वा पुरुष असो त्यांना 'President' च म्हटले जाते. या 'President' शब्दाचा इंग्लिश शब्दकोशात अर्थ– 'The

head of a government',[११] 'राष्ट्रध्यक्ष' याच 'President' शब्दासाठी आपण मराठीत 'राष्ट्रपती' हा शब्द वापरतो म्हणूनच मा. प्रतिभाताई पाटील यांना 'राष्ट्रपती' म्हणून संबोधले जाते.

स्त्रियांमध्ये असलेला पुरुषांइतकाच पराक्रम हा पुराण काळापासून इतिहासातून ते आजच्या आधुनिक काळापर्यंत जाणवल्या शिवाय राहिलेला नाही. पुराणामध्ये असलेली रामायणामधील रणांगणामध्ये स्वत: पतीच्या खांद्याला खांदा लावून सहकार्य करणारी कैकयी, इतिहासातील घोड्यावर मांड टाकून पाठीवर 'दामोदर' या दत्तक पुत्राला घेवून सर ह्युरोज या इंग्रज अधिकाऱ्याबरोबर १२० मैलांची घोडदौड करून शर्थीची झुंज देणारी 'जो खूब लडी वो तो मर्दानी झाशीवाली राणी थी !' या वाक्यातील मर्दानी शब्द हा तिची मर्दानगीच दर्शविणारा आहे. आझाद हिंदसेनेमधील कॅप्टन लक्ष्मी या कशाच्या प्रतीक आहे ? मर्दानगीच्याच ना ? म्हणजेच स्त्रीमध्ये पूर्ण क्षमता आहेत.

मराठी भाषेमध्ये लिंगव्यवस्था मोठ्या प्रमाणात दिसून येते. इंग्लिश मध्ये 'Friend' हा एकच शब्द स्त्री-पुरुष दोघांसाठीही वापरताना तो 'She Friend' व 'He friend' असा वापरला जातो, पण मराठीत मात्र तो मित्र व ती मैत्रीण असा लिंगभेदानुसार वापरला जातो. मराठीतील नामाची लिंगव्यवस्था तर पूर्णपणे यादृच्छिक आहे. निर्जीव वस्तूंचा निर्देश करणाऱ्या नामांनाही मराठी मध्ये लिंग असते. उदा. ती खुर्ची, तो डबा, ते पुस्तक, व्याकरणिक लिंगव्यवस्थेमागे स्त्री-पुरुष लिंगभेद म्हणजे पुल्लिंग, स्त्रीलिंग व नपुसकलिंग आणि भाषेतील नामांची व्याकरणिक लिंगव्यवस्था यांचा संबंध निश्चितच जोडला गेलेला असावा आणि त्यामागील इतर कारणांपैकी एक कारण म्हणजे भारतीयांची मानसिकताही असावी.

## स्त्रीवादाची पाश्चात्त्य पार्श्वभूमी :-

स्त्रीवादी ही विचारसरणी प्रथम पाश्चात्त्य देशात उद्याला आली आणि नंतर त्याचे लोण जगभर पसरले. त्याचबरोबर भारतातही हा स्त्रीवाद प्रस्थापित झाला. या स्त्रीवादाची सुरवात म्हणजेच 'पाश्चात्त्य' स्त्रीवाद असे मानण्यास काहीच हरकत नाही. कारण पाश्चात्त्य

देश हे नेहमीच भारताच्या एक पाऊल पुढे असतात. इंग्रजोत्तर काळात या सगळ्यांचा परिणाम भारतीय समाजावर झाला. नवीन शिक्षण, इंग्रजांचा इतिहास, समाज, संस्कृती, तत्त्वज्ञान या विषयांचे वाचन नवशिक्षित मंडळी करू लागली. त्याच्यानुसार नवशिक्षित मंडळी स्वत:च्या समाजाबद्दल आणि संस्कृतीबद्दल ही विचार करू लागली. पण पाश्चात्त्य देशा इतके सुधारित असून देखील स्त्रीला मात्र स्वांतत्र्यासाठी व समानतेसाठी लढे द्यावे लागले. तसेच चळवळी कराव्या लागल्या. माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मिळावा, गुलामगिरी तसेच स्त्रीला मिळणारे दुय्यमत्व नष्ट व्हावे. यासाठी स्त्रियांच्या अधिकारांची प्राप्ती करणाऱ्या अशास्त्रीयवादी चळवळींना एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धातच प्रारंभ झालेला होता. अनेक क्षेत्रात, राजकीय प्रक्रियेत, शिक्षणात, नोकरी, व्यवसायात स्थान प्राप्त करण्यासाठी पाश्चिमात्य स्त्रियांना दीर्घकाळ संघर्ष द्यावा लागलेला आहे. या पाश्चात्त्य स्त्रीमुक्ती चळवळीतूनच 'स्त्रीवादी' विचारांचा जन्म झालेला आहे.

## १. पाश्चात्त्य स्त्रीचळवळ –

पाश्चात्त्य देशाचा विचार केला तर जगाच्या तुलनेत अमेरिकन स्त्री ही अनेक बाबतीत नशीबवान हाती असे म्हणावे लागेल. तरी सुद्धा तिला मानव म्हणून आपले हक्क मिळविण्यासाठी, मिळकतीवर हक्क, मतांचा हक्क यासाठी अमेरिकन स्त्रियांनाच जास्तीत जास्त लढा द्यावा लागला. हाच स्त्रीचा स्वातंत्र्यविषयक जाणिवेचा पहिला टप्पा म्हणावा लागेल. १९ व्या शतकात या जाणिवेची सुरवात झाली इंग्लड, अमेरिका, फ्रान्स या देशातील कष्टकरी आणि मध्यमवर्गीय स्त्रियांनी मतदानाचा हक्क, शिक्षण, संपत्ती आणि समान कायदा यासाठी चळवळ उभी केलेली दिसते.

### १.१ स्त्रीमुक्तीचे पहिले पाऊल –

स्त्रीला 'स्व' जाणीव व स्वत:च्या सामर्थ्याची ओळख आपण कुठेतरी कमी पडत आहोत. आपला विकास खुंटत आहे. हे समजू लागले तेव्हा मात्र स्त्रीला त्यांचा शिक्षण आणि सामाजिक कार्यातील क्रियाशील सहभाग हा महत्त्वाचा वाटू लागला व ती आपली प्राथमिक गरज आहे. यांची त्यांना जाणीव होवू लागली ही

जाणीव त्यांनर १९६० नंतरच्या काळात होवू लागली. १९४५ ते १९६० पर्यंतचा हा कालखंड अमेरिकेच्या स्त्रीजीवनातील प्रचंड विसंगतीने भरलेला असला तरी 'सुप्त स्त्री सामर्थ्यांच्या' कालखंडानंतरच आधुनिक काळातील स्त्रीवादाचा सार्वत्रिक प्रसार झाला. हे ही विसरता येणार नाही.

प्रत्येक मानवी व्यक्ती मग ती स्त्री असो वा पुरुष ते एकाच पातळीवर असतात व्यक्ती स्वायत्ततेचे हे तत्त्व अठराव्या शतकाच्या प्रबोधनवादी चळवळीत उद्याला आले. या तत्त्वाचे राजकीय, आर्थिक व शैक्षणिक असे तीन महत्त्वाचे पैलू आहेत. त्यातूनच स्त्रियांसाठी मतदानाचा अधिकार, समानवेतन आणि समान शिक्षण या चळवळी सुरु झाल्या. पुरुषांप्रमाणे मतदानाचा हक्क स्त्रियांनाही असावा यासाठी स्त्रियांची आलेली 'सफ्रेजेट चळवळ' हा याच तत्त्वाचा अविष्कार होता. नवीन समाजव्यवस्थेच्या रचनेत सहभागी व्हायचे असेल तर प्रत्येकाला मतदानाचा हक्क असणे गरजेचे आहे. म्हणून स्त्रीवाद्यांची पहिली पायरी ही मतदानाचा हक्क असणे ही होती. इतर हक्क होतेच पण लोकशाही तत्त्वांमुळे स्त्रीवाद्यांना मतदानाचा हक्क हेच योग्य व व्यावहारिक दृष्टया आपले ध्येय साध्य करण्यासाठी पहिले पाऊल वाटले.

पुरुषकेंद्री समाजव्यवस्थेत 'स्त्री' नेहमीच शोषित मानली गेली. तिला मिळणाऱ्या दुय्यम स्थानाला विरोध हा १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात सुरु झाला. पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना ही मतदानाचा अधिकार असावा ही मागणी पुढे आली. १८६७ मध्ये जॉन स्टुअर्ट मिल यांनी ब्रिटीश पार्लमेंट मध्ये स्त्रियांच्या मताधिकाराबद्दल प्रथम मागणी केली. पार्लमेंटच्या सुधारणेच्या व लोकप्रतिनिधीत्त्वाच्या कायद्यांनी मत देण्याचा हक्क विस्तृत झाला. पण स्त्रियांना मतदानाचा हक्क नाकरण्यात आला. होता. त्यांना रोजगाराच्या पारंपरिक कामांहून निराळी कामे मात्र मिळू लागली जसे गिरण्यात बॉबीन भरणे, तंबाखूच्या कारखान्यात बिड्या वळणे, टंकलेखनावर काम करणे अशा कामामध्ये स्त्रियांना प्राधान्य मिळू लागले. यावेळी सर्व कामगार स्त्रिया एकत्र येऊन आपल्या अडचणी मांडू लागल्या.

रात्रपाळी नको, बाळतंपणाची रजा, पाळणाघराची सोय, समान वेतन अशा मागण्या करायला त्यांनी सुरूवात केली. लॉक, रुसो, ब्रेंथम या तत्त्ववेत्यांनी समान हक्क, समान दर्जा आणि स्वातंत्र्य ही तत्त्वे अविष्कृत करुन सरंजामी युरोपाला धक्का दिलेला होता. या तत्त्वांमुळे राजकीय क्षेत्रात सहभाग, मतदानाचा हक्क हा पुरुषांबरोबरीने मिळविणे व स्त्रियांच्या वरील अन्यायाला वाचा फोडणाऱ्यांना मतदान करणे, याविषयीची चर्चा स्त्रियांमध्ये सुरु झाली व त्यांच्या विचारांना एक नवी दिशा प्राप्त होऊ लागली. असे असले तरी स्त्री–पुरुष समानता मानणारे फ्रेंच राजक्रांतीचे उद्‌गाते तत्त्ववेत्ते लॉक, डेव्हिड ह्यूम, रूसो, बेंथम स्त्रियांना दुय्यम मानताना दिसतात. लॉकच्या दृष्टीने पुरुष हा सत्तास्थानावर असतो. स्त्री ही पुरुषापेक्षा दुय्यम असल्याचे आणि दुय्यमतत्त्वाला काही नैसर्गिक पाया असल्याचे समाधान लॉकला वाटत असल्याचे दिसते. तर ह्यूम म्हणतो विनम्रता योनीशुचिता ही स्त्रियांसाठी नैतिकमूल्ये आहेत. पुरुषांसाठी नाही आणि रूसो म्हणतो की, जन्मत:च कमजोर असणाऱ्या स्त्रियांवर पुरुषांचाच अधिकार आहे. निर्मितीसाठी स्त्रीचे शरीर योग्य आहे पण सामाजिक जीवनासाठी नाही. यासाठी तो स्त्रीला आपल्या सामाजिक करारामध्ये स्थान देत नाही.

फ्रेंच राज्यक्रांतीची लोकशाही तत्त्वे ही फक्त अप्रत्यक्षरीत्या स्त्रियांना लागू पडत होती. स्त्री ही पुरुषांवर अवलंबून असते म्हणून पुरुषांच्या स्वास्थ्यावरच स्त्रीचे स्वास्थ टिकते. समानतेचा पुरस्कार करणाऱ्या रुसोच्या मते स्त्री ही सामाजिक जबाबदारी पेलण्याइतकी बुद्धिनिष्ठ व स्वायत्त नाही. इंग्लड व फ्रान्स मध्ये त्यानंतर झालेल्या सुधारणा विषयक कायद्यांमध्ये समाजजीवनात स्त्रीला समान दर्जा का नाही ? हा प्रश्न येत नाही. ऑगस्ट कॉम्ट हा स्त्रियांचा मेंदू पुरुषांच्या मेंदूच्या तुलनेत लहान आहे म्हणून स्त्रिया खालच्या पायरीवर मानतो. जॉन स्टुअर्ट मिलचा पिता तत्त्वज्ञ जेम्स मिल हाही लोकशाही रक्षणासाटी प्रत्येक व्यक्ती ही मतदानाची हक्कदार आहे असे म्हणताना ती स्त्रीची जबाबदारी मात्र पुरुषांवर टाकतो.

या सर्वांच्या विचार करता फ्रेंच राज्यक्रांतीत स्त्रियांच्या पदरी काही पडले नाही. याच काळात मादाम द स्टेल हिने फ्रेंच राज्यक्रांतीचे विश्लेषण करुन स्त्रीपुरुष तुलना केली. रुसो प्रमाणे तिलाही वाटते की स्त्रीस्वभाव हाच तिच्या दुय्यमत्त्वला कारणीभूत असतो. असे असले तरी सुद्धा स्त्रीविषयक असलेला पुरुषी दृष्टीकोनावर टीका करुन पुरुषांची मूल्य व स्त्रीच्या सामाजिक भूमिकांविषयी पुरुषांची नापसंती या विरुद्ध तिने प्रथमत आवाज उठविला याचा परिणाम पुढे मेरी वुलस्टोन क्रॉफ्ट व हॅरिअेट टेअर या स्त्रीवाद्यांच्या विचारसरणीवर तिचा प्रभाव पडला आहे.

ऑलिम्प-दि-गॉजेस हिने ही नॅशनल असेंब्लीपुढे १७ मागण्या सादर करुन स्त्रियांच्या समान दर्जाची मागणी केली होती. मिसेस फौसेट यांच्या नेतृत्वाखाली इंग्रजस्त्रियांनी चळवळ सुरु केली. स्त्रियांच्या हक्कासाठी १८७८ मध्ये आंतरराष्ट्रीय चळवळ झाली तर स्त्रीवादी समीक्षा १९८२ मध्ये फेमिनिस्ट कॉंग्रेस ही स्त्री स्वांतत्र्यवादिनींची परिषद भरविण्यात आली. १९०१ मध्ये स्त्रियांच्या मतदानाच्या हक्काबद्दल मागणी करण्यात आली आणि १९४५ मध्ये फ्रेंच स्त्रियांना मतदानाचा हक्क प्राप्त झाला. अशाप्रकारे स्त्रीवादी चळवळीची बीजे या शतकाच्या सुरवातीला पेरली गेली.

इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, मध्ये स्त्रियांच्या मताधिकारासाठी अनेक चळवळी झाल्या. इंग्लंड मध्ये 'सफ्रेजेट चळवळ' मिसेस पॅकटेस्टच्या नेतृत्वाखाली १९११ मध्ये सुरु झाली. तर अमेरिकेत १६७४ मध्ये मार्गरिट ब्रेंटन हिने मेरीलॅंड विधनसभेत 'स्त्रियांना स्थान व मतदाना हक्क मिळण्याची मागणी केली. १८४८ मध्ये सिनोकॉल्स न्यूयॉर्क येथे स्त्रियांच्या हक्कांची, जगाच्या इतिहासातील पहिली परिषद भरविली. यामध्ये स्त्री स्वातंत्र्याचा जाहिरनामा प्रसिद्ध झाला. 'सर्व स्त्री-पुरुष हे जन्माने समान आहेत. मनुष्यजातीच्या इतिहासाने मात्र पुरुष स्त्रिया हे उच्चनीय भेद घडवून आणून स्त्रियांवर अन्याय केला''[११] स्त्रियांना शिक्षणात समान सहभाग, धर्मगुरु होण्याचा, शिकविण्याचा, पैसा मिळविण्याचा, निवडणूकीत मतदान करण्याचा आणि निवडणूक

लढविण्याचा हक्क यांची मागणी करण्यात आली तसेच १८६९ मध्ये 'अमेरिकन वुमन सफ्रेज असोसिएशन' ची स्थापना झाली. याद्वारे घटना दुरुस्तीची मागणी करण्यात आली. १९१० साली कोपनहेगेन येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय महिला परिषदेने आठ मार्च हा दिवस 'महिला दिन' म्हणून मानण्याचा ठराव पास केला. अनेकदा मतदानाचा हक्क फेटाळल्या नंतर पहिल्या महायुद्धातील स्त्रियांची कामगीरी पाहून १९१९ च्या जूनमध्ये कॉंग्रेसला १९ वी दुरुस्ती सर्व घटक राज्यांकडे पाठवावीच लागली आणि अमेरिकन स्त्रियांना मतदान करण्याचा हक्क प्राप्त करुन घेताना, त्याचबरोबर चळवळीच्या माध्यमातून त्यांनी वैवाहिक आणि आर्थिक स्तरावर, पालकत्त्वाविषयीचेही समान अधिकार प्राप्त करुन घेतले. अनेक संघर्षांना तोंड देऊन फ्रान्स स्त्रियांनी हे अधिकार मिळवले. 'स्त्री' ही सर्वात तिरस्करणीय आहे, चेटकिणी म्हणून त्याचा छळ करणे, पुस्तकातून स्त्रियांची चेटकिणी, द्वेशी, संतापी, दुष्ट, स्वार्थी अशाच प्रतिमा लेखकांनी त्यांच्या पुस्तकातून निर्माण केल्या होत्या. यातून स्त्रियांना दुय्यमत्त्वाची जाणीव निर्माण झाली. 'ख्रिस्तीन द पिसॉ' हिने 'Epistle to the God of Love' या पुस्तकात स्त्रियांची बाजू मांडली. १९४२ मध्ये 'मॉर्टीन लि फॉक ने, १५५२ 'लुईस लॅबे', १५५९ मध्ये मागरिट-द-नॉवारे यांनी आपल्या पुस्तकात स्त्रियांवरील अत्याचाराची बाजू मांडली.

सन १९२९, १९३२, १९३५ मध्ये लागोपाठ मांडलेले, स्त्रियांच्या मताधिकाराचे ठराव, सिनेटने फेटाळून लावले. या काळातच स्त्रियांनी मुलामुलींसाठी एकच अभ्यासक्रम, विवाहित स्त्रियांना कायदेशीर दर्जा, हे हक्क प्राप्त करुन घेतले. याच दरम्यान जर्मनीकडून झालेल्या पराभवामुळे स्त्रियांना अनेक छळांना समोरे जावे लागले. परंतु एप्रिल १९४४ ला फ्रान्समधील सिनेटना मतदानाबरोबर इतर महत्त्वाच्या बाबींमध्येही समान दर्जाची मान्यता द्यावी लागली.

प्रदीर्घ संघर्षानंतर इंग्लंड, अमेरिका आणि फ्रांन्समधील स्त्रियांना मताधिकार, शिक्षणात, संपत्तीत, कायदात समान हक्क १९२० पर्यंतच्या कालखंडात प्राप्त झाले.

तेव्हा पश्चिमात्य देशातील स्त्रीविषयक स्वातंत्र्याच्या जाणिवेचा एक टप्पा संपलेला होता. त्यानंतर मात्र स्त्री चळवळीच्या दृष्टीने १९२० साला पासून १९६० सालापर्यंत जवळजवळ ४० वर्षे काहीच विशेष घडामोडी घडलेल्या दिसत नाहीत. इतका संघर्ष करुन मताधिकार मिळाल्यावर स्त्रियांची दुय्यमत्त्वाची भूमिका कायदेशीरदृष्ट्या संपल्यासारखी वाटली असली तरी तिच्या वाट्याला वैफल्यग्रस्त जीवन आलेच. तिच्या समोर विचारक्षम, निर्णयक्षम या नव्या स्त्रीची प्रतिमाच नव्हती. 'मी कोण?' याचा विचार करण्याआधीच 'बाईपण' हे तिच्या माथी मारले जाते. यात ' 'पुस्तके, मासिके, वृत्तपत्रे व मोठी माणसे यासगळ्यांचाच वाटा, बाईचा जीवनाची इतिश्री बायको आणि आई होण्यातच आहे.'' असे समाजात बिंबवले जायचे. असे डॉ. अश्विनी धोंडगे यांनीही या संदर्भात म्हटलेले आहे.[१२] घर, संसार, बाजारहाट, ही कार्यक्षेत्रे बनली. व खास स्त्रीचे वेगळे वैशिष्ट्य जपणे, या कल्पनेला स्त्रीत्त्वाचे रहस्य (Feminine Mistique) असे गोंडस नाव मिळून त्याच्या मोहिनीतच स्त्रिया अडकलेल्या होत्या, हे दिसून येते. हा स्त्रियांच्या अस्तित्त्वहीनतेचा एक टप्पा होता.

या प्रक्रियेतून जाताना स्त्रियांना व्यक्तिगत पातळीवर मानसिक असाधान व तीव्र टोचणी अनुभवास येऊ लागली. 'स्त्रीत्त्वाचे रहस्य'' या कल्पनेने भारावून गेलेल्या त्या काळातील स्त्रीला 'माणूस' म्हणून स्वतंत्र राहणे अपराधीपणाचे वाटत राहायचे, तरीही अस्तित्त्वहीनतेची भावनाही स्वस्थ बसू देत नसायची. या दुहेरी संघर्षात स्त्री अडकलेली होती. १९६३ साली बेटी फ्रिडनचे 'The Feminine Mistique' हे पुस्तक प्रसिद्ध झाल्यानंतर अमेरिकन स्त्रियांना आपल्या परिस्थितीची जाणीव होवू लागली आणि स्त्रियांना स्वत:ला सामाजिक-राजकीय जीवनात सहभाग घेणे, घराबाहेर आपले आवडीचे क्षेत्र असणे, हा अधिकार असला पाहिजे आणि अस्तित्त्वाचा गाभा असला पाहिजे. त्याची प्रकर्षाने जाणीव व्हायला लागली. स्त्रिया घर, संसार, यांच्याबाहेर पडू लागल्या व पुन्हा संघर्षाच्या विश्वात त्या उतरू लागल्या.

१९६० नंतर स्त्रियांची नवमतवादी चळवळ उदयास आली. 'स्त्रीवादाचे क्रांतिकारक राजकारण, स्त्रीवादी विचारांची बैठक व 'पुरुषांच्या दास्यातून स्त्रीची मुक्तता' हे ध्येय ह्या नव्या चळवळी नागे होते. मेरी वुलस्टोन क्रॉफ्ट, जॉन स्टुअर्ट मिल, व्हर्जिनिया वुल्फ, सिमॉन-द-बोव्हा अशा विचारवंत लेखिकांनी मौलिक ग्रंथ लिहून व पाश्चात्त्य देशातील स्त्री-चळवळीने स्त्रीवादाची भक्कम मांडणी केलेली दिसून येते. १९७५ हे आंतरराष्ट्रीय महिलावर्ष म्हणून युनोने जाहीर केले. स्त्री-पुरुष समानतेचे एक मूलगामी आंदोलन हे पाश्चात्त्य जगात साकार झाले होते, ते जगभर प्रसारीत होत गेले.

**भारतीय स्त्रीवाद :-**

भारताची सांस्कृतिक पार्श्वभूमी पाहिली तर त्याच्या घडणीच्या दृष्टीने काही पौराणिक स्त्रीरत्नेही फार मोलाची आहेत. (सीता, सती, सावित्री, द्रौपदी, शकुन्तला, गांधारी) त्यांच्या जीवनात अनेक प्रतिकूल परिस्थिती आल्या पण त्यांनी त्यांचा सामना करुन अपूर्व यश संपादन करुन आजच्या समाजपुढे आदर्श निर्माण केला. वैदिक काळातही अनेक स्त्रियांनी शिक्षक, तत्त्वज्ञ व वादविवादपटू म्हणून नावे गाजविली. (गार्गी, मैत्रेयी, लोपामुद्रा) या उपलब्ध असलेल्या ऐतिहासिक दस्ताऐवजावरुन असे दिसून येते की, ग्रीक व रोम अशा सुसंस्कृत देशांतील स्त्रियांपेक्षाही वैदिक काळातील भारतीय स्त्रीचा दर्जा फार समधानाकारक होता. असे अजूनही स्त्रीला उच्चप्रतीचे शिक्षण देणारा वर्ग सर्व समाजाच्या मानाने लहान होता. या समाजातील सर्वसाधारण पुरुषच कुटुंबप्रमुख म्हणून सत्ता गाजवत असला तरी सामाजिक वैचारिकता पाहता वैदिक काळात स्त्रीला अधिकार प्राप्त होते. तरीदेखली मुलगा झाल्यावर ज्या प्रमाणात आनंदोत्सव होत असे त्या प्रमाणात मुलगी झाल्यावर होत नसे. मुलींवर मुलांप्रमाणेच संस्कार केले जात. वयाच्या आठव्या वर्षी मुलांप्रमाणे मुलींवर उपनयन संस्कार होत असत ऋग्वेदीय सूक्तांत स्त्रीला गृहिणी व सहचारिणी म्हणून कुटुंबात मानाचे

स्थान होते.[१३] तिला स्वत:च्या विकासाबाबत बरेच स्वातंत्र्य होते अनेकदा ती पुरुषाच्या बरोबरीने भाग घेताना दिसून येते. विवाहाबाबतही तिच्यावर सक्ती होत नसे. ज्ञानार्जनाच्या तसेच अन्य काही कारणांनी काही मुली जन्मभर अविवाहित राहू शकत असत. याशिवाय औद्योगिक क्षेत्रातही तिला बरोबरीचे स्थान असे केवळ राजकीय व प्रशासकीय क्षेत्रात मात्र त्या कुठेही सहभागी होत नव्हत्या. असे तत्कालीन ग्रंथांवरुन लक्षात येते.[१४]

तथापि, स्मृतिकालखंडामध्ये ही अवस्था एकदम उलटी झाली 'अष्टवर्षे भवेत कन्या' हा इतका कडक दंडक होता की, काही वेळा अगदी पाळण्यात देखील मुलींची लग्ने लावली जात 'स्त्री' ही मुळातच विषयवासनेने लुप्त, अपवित्र, अप्रमाणिक, अनैतिक असते असे मनूचे स्पष्ट मत होते. म्हणूनच स्त्रीने पती अनितीमान असला तरी त्याची सेवा करावी हाच पत्नीधर्म होय असे 'मनूस्मृतीत' म्हटले आहे.

विशील : कामवृत्ती वा गुणैर्वा परिवजित : ।

उपचर्य : स्त्रिया साहवा सतत देववत्पति : ।।[१५]

–मनुस्मृती

(पती शीलरहित, गुणरहित व स्वेच्छाचारी असला तरी साध्वीने स्त्रीने नेहमी देवाप्रमाणे त्याची शुश्रूषा करावी.) प्राचीन काळी स्मृतिग्रंथांनी निश्चित केलेला आचारधर्म हा भारतीय समाजरचनेचा आणि समाजिक नीतीचा आधार होता आणि यांनीच स्त्रीचे स्वातंत्र नाकारले आणि शुद्राप्रमाणेच तिला शिक्षणाच्या, ज्ञानाच्या, आत्मविकासाच्या अधिकारापासून वंचित ठेवले. चातुर्वण्यव्यवस्थेनुसार तिला जातीय विषमतेमध्ये बांधले गेले. विवाहसंस्थेने तिला पुरुषसत्ता मान्य करण्यास भाग पाडले. कुटुंबसंस्थेनुसार तिला सेवा करणारी हक्कांची दासी बनविण्यात आले. अनेक अवगुणांचे आरोप तिच्यावर करुन तिला दडपण्यात आले. इतकेच नव्हे तर तिचे शोषण करण्याचे मार्गदर्शनही केले.

या काळात भारतीय समाजातील स्त्रीचे स्थान केवळ 'बीज वाढवण्याचे क्षेत्र' (शेत) किंवा भस्त्रा (कातडी पिशवी) एवढेच होते. माणूस म्हणून कोणतेही स्थान वा प्रतिष्ठा तिला नव्हती. किंबहुना माणूस म्हणून स्त्रीची गणनाच होत नव्हती. यावरुन भारतीय जीवनात स्त्रीचे नगण्य स्थान दिसून येते. एक भोगवस्तू म्हणून जसे स्त्रीला इतरत्र देशातील परंपरेत पाहण्यात आले. तसेच भारतीय परंपरेतही पाहण्यात आले याचा पुरावा म्हणजे भारतात सर्वत्र प्रचलित असलेली 'देवदासी प्रथा.'

भारतीय स्त्रियांपुढे 'पंचकन्यास्मरण' व 'पातिव्रत्य' या पत्नीधर्मांची लक्ष्मणरेषा आखून ती न ओलांडण्याची सक्ती त्यांच्यावर केली गेलेली. पंचकन्यांचे आदर्श नमुने त्यांच्यासमोर ठेवून तशाच आदर्श वागणुकीची अपेक्षा त्याच्याकडून केली गेली.

स्त्रीला समाजात नेहमीच दुय्यम दर्जा दिला जात असे ते स्त्री अर्थार्जन करीत नसल्याने किंवा उत्पादन प्रक्रियेत स्त्रीचा सहभाग नसल्यानेच. ती गुलामाचे जीवन जगू लागली पण सुरवातीला स्त्रीने उत्पादन प्रक्रियेत भाग घेतलेला दिसून येतो तसेच दुसऱ्या महायुद्धानंतर मध्यमवर्गीय स्त्री अर्थार्जनासाठी नोकरी करताना दिसून येते. पण तिला अजूनही आर्थिक स्वातंत्र्य मिळालेले नाहीच. तसेच तिच्या मिळकतीवर पतीच आपला हक्क दर्शवितो. १९ व्या शतकापर्यंत सर्वसामान्य भारतीय स्त्रीची परिस्थिती थोड्याफार फरकाने अशीच दिसून येते. यावरुन भारतीय स्त्रियांच्या प्रश्नांचा वेगवेगळ्या पातळीवर विचार केला तर ती स्त्रीत्त्व विसरून खूप दूरवर गेलेली दिसून येते. तिला यातून मुक्त होण्याची गरज आहे असे दिसून येते.

भारतीय वैदिक कालखंडापासून आपण जर पाहिले तर तेव्हा ही स्त्रीमुक्तीची बीजे रूजलेली दिसतात. पहिला स्त्रीमुक्तीचा प्रयत्न चार्वाकाने केला. त्यांनी भारतीय समाजाला आत्मा परमात्म्याच्या चाकोरीतून मुक्त केले. पुढे गार्गी नावाच्या स्त्रीने आत्म्याविरुद्ध विचार मांडले बुद्धाने भिक्खू संघात स्त्रीलाही प्रवेश दिला.

मध्ययुगीन काळात चक्रधर स्वामीनी पुरुषाप्रमाणे स्त्रीला ही ज्ञानार्जनाचा हक्क असल्याचे सांगितले. वारकरी संप्रदायामध्ये मुक्ता, जनाबाई, सोयराबाई, निर्मळा, वेणाबाई, बहिणाबाई या स्त्रियांना भक्तिच्या अविष्कारामध्ये स्त्रीत्त्व आड आले नाही.

प्राचीन काळापासून स्त्रीमुक्तीची बीजे दिसत असली तरी स्त्रीमुक्तीला खऱ्या अर्थाने वळण मिळाले ते १९ व्या शतकातच. १९ व्या शतकात इंग्रजी आमदानीनंतर आणि औपचारिक शिक्षण पद्धतीमुळे पाश्चात्त्य संस्कृतीशी आलेल्या संपर्कामुळे भारतीय राजकीय आणि सांस्कृतिक जीवन बदलत गेले. नव्या विचारांशी व नव्या विज्ञानाशी आपला संबंध आला आणि भारतात परिवर्तनाची लाट निर्माण झाली. नवशिक्षितांनी एका नव्या दृष्टीने आपल्या संस्कृतीकडे, धर्माकडे, समाजरचनेकडे पाहण्यास सुरुवात केली. या दृष्टीमुळे वर्ण आणि जाती यामुळे निर्माण होणारी विषमता, अस्पृश्यता, त्याचबरोबर स्त्रियांच्या अवस्थेकडेही त्याचे लक्ष वेधले. इंग्रजी शिक्षणामुळे उदारमतवादी विचारांशी व व्यक्तिस्वातंत्र्यादी मूल्यांशी या नव शिक्षितांचा परिचय झाला. यामुळे सुधारणेचे युग भारतात अवतरले.

भारतीय स्त्रीला सर्वच पातळीवर मुक्त करण्याचा पहिला प्रयत्न महात्मा फुले यांनी केला. मृत पतीच्या संपत्तीत विधवा पत्नी वाटेकरी होवू नये. याकरिता स्तीप्रथेचे उदात्तीकरण करुन विधवांना जिवंत जाळले जाई. ही प्रथा बंद व्हावी म्हणून १८२९ साली राजाराम मोहन रॉय यांनी प्रयत्न करुन संतीबंदी कायदा लागू करुन घेतला. स्त्रीच्या सुधारणेचे मूळ हे स्त्रीशिक्षणात आहे हे जाणून जोतिबा फुले यांनी मुलींसाठी शाळा सुरु केली. त्याप्रमाणे आगरकर, धोंडो केशव कर्वे, सर सईद अहमद खान यांनी स्त्रीशिक्षणासाठी प्रयत्न केले.

बालविवाह, बालाजरठ विवाह, विजोड विवाह, कन्याविक्रय या अनिष्ट प्रथांमुळे स्त्रियांना भोगावा लागणारा त्रास लक्षात घेऊन, सुधारकांनी संमती वयाचे विधेयक यावे याकरिता प्रयत्न केले. यामध्ये बेहरामजी मलबारींनी पुढाकार घेतला तर नारायण मेघाजी

लोखंडे आणि बुद्रद्दीन तय्यबजी यांनी या विधेयकासाठी लोकजागृती केली. जैन समाजातील शेठ हिराचंद नेमचंद दोशी यांनी बालाजरठविवाह, विजोड विवाह, कन्याविक्रय यासारख्या प्रथांना विरोध करुन स्त्रियांमध्ये जागृती घडवली. या सर्वांच्या प्रयत्नांचे फळ म्हणून स्त्रियांवर अन्याय करणाऱ्या रुढी कमी होऊन त्यांना सन्मानाचे जीवन जगता यावे म्हणून सतीबंदी, विधवाविवाह, संमती वय. इ. कायद्यांची तरतुद झाली. तसेच स्वातंत्र्यापूर्वी १९२८ मध्ये बालविवाह प्रतिबंधक शारदा कायदा आणि १९३७ स्त्रियांना दत्तक, वारसा हक्क (वुमन्स राईट प्रॉपर्टी ॲक्ट) देण्याच्या संदर्भात कायदा झाला. स्वातंत्र्यानंतर स्त्रियांचे हक्क, अधिकार, सामाजिक सुरक्षा आरोग्य, इ. विषयाची जाणीव जागृती होऊन ती जसजशी विकसित होत गेली तसे कायदे ही तयार झाले.

स्त्रियांमध्ये स्त्रीमुक्ती-विचारसरणीचा परिचय भारतीय स्त्रियांना झाला. त्यांना स्त्रियांचे प्रश्न त्यातून निर्माण होणारा ताण जाणवू लागला. कृती केल्याशिवाय परिस्थिती बदलणार नाही. हे त्यांना समजले होते. त्यातून त्याच्या ठायी काही तरी करुन दाखविण्याची इच्छा निर्माण झाली. आत्मविश्वास निर्माण झाला. स्त्रीची आत्मप्रतिष्ठा उंचावण्यासाठी समाजपरिवर्तन गरजेचे आहे. याविषयीचे भान त्यांना होतेच. याच टप्प्यावर स्त्रियांचे वैचारिक नाते जागतिक पातळीवरील विचारांशी जोडले गेले हे सर्व भारतीय स्त्रियांना नवीन, अनोळखी होते. पण त्यातून पुढे त्यांना आपल्या कार्याची दिशा उलगडत गेली.

स्त्रियांमध्ये एक नवीन उमेद निर्माण होऊन त्यांनी स्मृतिग्रंथांमुळे अडकलेले आपले पाऊल शिक्षणाच्या दिशेने वळविले. त्या शिकू लागल्या, आपले अस्तित्त्व निर्माण करण्याचा प्रयत्न करु लागल्या. विशिष्ट सामाजिक प्रथा व धार्मिक श्रद्धांमुळे स्त्रीला मिळणारे दुय्यमत्व याला या विरोध दर्शवू लागल्या. त्याविरुद्ध स्वतःची मते त्या लेखनातून मांडू व बोलू लागल्या.

स्वभावतः कोमल वाटणाऱ्या महिलांनी रणचंडीचे रूप घेवून भीषण संग्रामात भाग घेतला. झाशीची राणी लक्ष्मीबाईपासून नेताजींच्या आझाद हिंद सेनेतील डॉ. लक्ष्मी

स्वामिनाथन यांच्यापर्यंत अगणित महिलांनी स्वातंत्र्यवेदीवर बलिदान केले. १९२० नंतर महात्मा गांधीजीच्या प्रेरणेने सत्याग्रहाचे नेतृत्व करणाऱ्या सरोजिनी नायडू तसेच १९०६ साली स्टूटगार्ड येथील संमेलनात युनियन जॅक ऐवजी पहिल्या प्रथम भारताचा स्वतंत्र फडकविणारी महिला म्हणजे भिकाईजी कामा, श्रीमती विजयालक्ष्मी पंडित, कमला देवी, अमृत कौर, क्रांतिदेवता श्रीमती अरुणा असफ अली, बीना दास, कल्पना दत्त, प्रतिलता बडड्रेदार अशा या नारीरत्नांनी भारतातील राजकीय क्षेत्रात आपला ठसा उमटविला.

स्त्री-पुरुष समानता हे मूल्य समोर ठेऊन स्वातंत्र्याप्राप्ती पर्यंत स्त्रियांच्या विकासाचे प्रयत्न सुरु असलेले दिसतात. सामाजिक, धार्मिक प्रथा व परंपराच्या नावाखाली स्त्री आणि पुरुष या दोघांमध्ये पुरुषाला प्राधान्य देऊन स्त्रीला कनिष्ठ दर्जा, दुय्यमत्व बहाल केले जाते व तिला बंधनात ठेवले जाते. पुरुष मात्र स्त्रीचे अध:पतन करुन तिच्यावर हक्क गाजवण्यास मोकळा असतो. या गोष्टीला कडाडून विरोध महात्मा जोतिबा फुले आणि ताराबाई शिंदे यांनी केला. पं. नेहरु आणि डॉ. आंबेडकर यांनी स्वातंत्र्यप्रातीनंतर स्त्रियांना मतदानचा हक्क मिळवून दिला. राजाराम मोहन रॉय यांच्या पासून ते महाराष्ट्रातील न्यायमूर्ती रानडे यांच्या पर्यंत ज्यांनी ज्यांनी समाजसुधारण्याचे कार्य केले. त्यांनी स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाला विरोध केला आणि स्वातंत्र्य पूर्व काळात शाहूमहाराजांनी केलेले काही कायदे स्त्री-पुरुष समता प्रस्थापित करणारे आहेत. तसेच बहुजन समाजातील स्त्रीसुद्धा सर्व मानवी हक्कांना पात्र आहे. हे तत्त्व जोतिबा फुलेनी आपल्या सर्व लेखनातून आग्रह पूर्वक मांडले आहे. ताराबाई शिंदे यांनी तर १८८२ ला 'स्त्री-पुरुष तुलना' यापुस्तकाचे लेखन करुन तत्कालीन समाजात वादळ निर्माण केले. या लेखनात स्त्रीला समाजात मिळणारे नगण्य स्थान अधोरेखित झाले आणि वास्तविक पातळीवर स्त्रीचे पुरुषाहून असणारे श्रेष्ठत्व दिग्दर्शित झाले. त्यामुळे स्त्रीला स्वतंत्र, सन्मानाचे, हक्कांचे आणि पुरुषाच्या बरोबरीचे स्थान असले पाहिजे याचे भान उत्पन्न झाले आणि खरचं असे म्हणता येईल की, स्त्रीच्या प्रदीर्घकालीन मौनानंतर उमटलेला, समाजाला कुंठित करुन टाकणारा स्वर म्हणजे ताराबाईंचे 'स्त्री-पुरुष तुलना' हे लेखन होय.

महात्मा गांधीचे स्त्रीशिक्षणविषयक विचार काही अंशी सनातनी विचारधारणेशी जुळणारे असले तरी ज्या संख्येने सर्व स्तरातील स्त्रियांना त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत मोठ्या प्रमाणावर सहभागी करुन घेतले ही प्रचंड संख्या पाहता स्त्रीविषयक जाणीवेला त्यांनी सशक्त केले यात शंकाच नाही. भारतीय स्त्रीच्या विकासामध्ये पुरुष सुधारकांचा महत्त्वाचा वाटा दिसून येतो हे नाकारता येणार नाही.

या सर्व प्रयत्नाला आजच्या रुढ अर्थाने स्त्रीवाद म्हणता येईल का ? अशी शंका उत्पन्न होते. स्त्रीवादी स्त्रियांनी १९ व्या शतकातल्या सुधारकांवर टीकाच केलेली दिसते. त्यांच्या दृष्टीने सुधारकांच्या प्रयत्नांमागे दोन हेतू आहेत ते म्हणजे विधवा स्त्रिया, परित्यक्ता स्त्रियांचे हाल त्यांना पहावेनात त्यांना स्वावलंबी करणे त्यांना महत्त्वाचे वाटले व दुसरे म्हणजे इंग्रजी शिकू लागलेल्या पाश्चात्त्य समाजाचे वारे लागलेल्या मध्यवर्गीय पुरुषांना सुविद्य सहचारीची आवश्यकता वाटू लागली होती. या टीकेत तथ्य नाही असे म्हणता येणार नाही म्हणून सर्वच स्त्री सुधारणेच्या प्रयत्नांना टीकेचे लक्ष्य बनविता येणार नाही.

आज 'स्त्रीवाद' ही राजकीय विचार प्रणाली आहे. पण १९ व्या शतकापासून सुधारकांनी केलेल्या प्रयत्नांमध्ये आजच्या स्त्रीवादाप्रमाणे राजकीय दृष्टीकोन नाही. हे स्पष्टपणे जाणवते. जिथे पुरुषप्रधानतेमुळे स्त्रीवर अन्याय होत आहे. तिथे जर पुरुषच स्त्रियांचे प्रश्न व सुधारणेची बाजू मांडतो तेव्हा शंका उपस्थित होणे स्वाभाविकच आहे हे सर्व करताना सनातन्यांवर आणि पुरुषांवर टिका झाली आहे. तरीही पण त्या प्रश्नाकडे पाहताना पुरुषप्रधान व्यवस्थेच्या अंगाने न पाहता धर्माच्या नावाखाली होणारे अन्याय म्हणून त्यांचा विचार केला गेला. मालतीबाई बेडेकरांनी तर 'शबरी' मध्ये स्त्रीवरील अन्यायाची पार्श्वभूमी म्हणून कुटुंबातील पुरुषी वर्चस्वाबरोबरच भारतीय मनाची परंपराप्रियता, महायुद्धोत्तर परिस्थिती, वाढती महागाई, भांडवलशाही, मूल्यांची घसरण इ. अनेक सामाजिक संदर्भाचा विचार केला आहे.

यावरुन असे म्हणता येईल की, १९व्या शतकापासून स्त्रीवादाच्या व स्त्रीमुक्तीच्या दृष्टीने जे काही स्त्रीसुधारणेचे महत्त्वाचे प्रयत्न झाले ते आजच्या अर्थाने स्त्रीवादी नाहीत. आजच्या स्त्रीवादामधील स्त्री–पुरुषांच्या संबंधामधील हितसंबंधाचे राजकारण, पुरुषी वर्चस्व या संकल्पनांचे अमूर्तीकरण या प्रयत्नांमध्ये आढळत नाही. साहजिकच त्यांच्याकडे मानवमुक्तीचे प्रयत्न म्हणूनच पहावे लागेल.

आज ज्या अर्थाने भारतात स्त्रीवादी विचारसरणी आढळते, ती साधारणत: निर्माण झाली १९७५ नंतरच. संयुक्त राष्ट्रसंघाने १९७५ हे जागतिक महिला वर्ष जाहीर केल्यावर भारतात त्याचे स्वागत झाले. त्याच्या स्वीकारार्थ अनेक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. स्त्रियांची सामाजिक परिस्थिती व दर्जा यांचा राष्ट्रीय पातळीवर शोध घेण्यासाठी डॉ. फुलरेणू गुहा यांच्या अध्यक्षतेखाली महिला आयोगाची स्थापना झाली. 'स्टेटस ऑफ विमेन इन इंडिया'– स्त्रियांचे सामाजिक स्थान, स्त्रियांचा दर्जा, कायदा, घटनात्मक तरतुदींचे परिणाम, शिक्षण, विकास, नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या अडचणी, रोजगार, वेतन, लोकसंख्या, जन्ममृत्यूप्रमाण, स्त्रियांची भूमिका या संदर्भात आयोगाने कसून पाहणी केली.

'मुलगी झाली हो' हे ज्योती म्हापसेकर यांचे नाटक आणि प्रदर्शने, स्लाइड शो, भाषणे लेख इ. द्वारा स्त्रीवादी विचारसरणीचा प्रसार होऊ लागला तसेच स्त्रियांसाठी काम करणारे अनेक गट ही उदयाला आले. 'स्त्री संघर्ष समिती', 'महिला दक्षता समिती', 'संघर्षवादिनी', 'सहेली', 'जनवादी महिला सभा', 'समाजवादी महिला गट', 'वूमेन सेंटर' , 'नारी समता मंच', 'क्रांतीकारी महिला संघटना', 'मिळून साऱ्याजणी', 'महिला बचत गट' अशी उदाहरणे देता येतील. या संघटना स्त्रियांचे प्रश्न सोडविण्यासाठी अनेक कार्यक्रम राबवतात व आजही या संघटनांचे कार्य सुरु आहे.

'भारतीय स्त्रीवाद' या सर्वातून दिसून येतो का ? भारतातील स्त्रीविषयक सुधारणेच्या इतिहासाचा वेध घेतल्यानंतर भारतीय स्त्रीवाद आकाराला येऊ शकेल का ? या प्रश्नाकडे वळताना 'अरुणा श्री. दुभाषी' यांनी 'भारतीय स्त्रीवाद' या आपल्या लेखात

'भारतीय स्त्रीवाद' हा शब्दसमुच्चय स्पष्ट करून दाखवला आहे. 'भारतीय' या शब्दाचा भारतात असा सरळ अर्थ घेतला तर प्रश्नांचे स्वरुप भारतात स्त्रीवाद आकाराला येऊ शकेल का ? असे होते. हा प्रश्न उपस्थित करण्याचे काहीच कारण नाही. कारण, भारतात स्त्रीवाद आलेला आहे. त्याचे दर्शक म्हणून १९७५ नंतर सुरु झालेल्या चळवळी आणि स्थापन झालेल्या निरनिराळ्या संस्था आहेत म्हणून वरील प्रश्न निरर्थक आहे.

'भारतीय' या शब्दाचा अर्थ काहीसा देशीवादाशी नाते सांगणारा आहे 'भारतीय म्हणजे भारताच्या परंपरेशी, इथल्या परिस्थितीशी, मातीशी नाते सांगणारा, भारतीय तोंडवळा असणारा असा हा अर्थ होय.'[१६] हा अर्थ घेऊन प्रश्नांचा विचार केला तर एक वेगळी दिशा मिळू शकते. पाश्चात्त्यापेक्षा काही वेगळा असा भारतीय स्त्रीवाद आपल्याला मांडता येईल का ?

या दिशेने विचार करण्यासाठी भारतीय परंपरेत या स्वरुपाच्या विचाराला काही आधार आहे का? याचा शोध प्रथम घ्यावा लागला आणि वरील सर्व सांगोपांग माहितीवरुन आपल्या परंपरेत या विचाराला थोडा का होईना पण आधार आहे पाश्चात्त्य प्रमाणे नसला तरी भारतीय परंपरेत स्त्रीवाद आढळतो पण तो त्या काळी 'स्त्रीवाद' या संकल्पनेने रुढ नव्हता. त्याचा त्या दृष्टीने कधीही विचार केला गेला नव्हता.

वेदकाळात स्त्रीला अनेक अधिकार होते. गौतमबुद्धांनी स्त्रियांना दीक्षेचा व भिक्षुवृत्तीचा अधिकार दिला आहे. स्त्रियांनी लिहिलेले वाङ्मय 'थेरीगाथे' मध्ये समाविष्ट केले नंतरच्या काळात महानुभाव, वारकरी, लिंगायत इ. पंथांनी स्त्रीला स्थान दिले आहे.

भारतीय स्त्रियांनी अनेक कठीण परिश्रमातून स्वत:च्या अस्तित्त्वाला आकार देण्याचा प्रयत्न केला आहे. मध्ययुगीन काळात महाराष्ट्रात महदंबा, हिराईसा, बहिणाबाई, वेणाबाई अशा संत कवयित्री आढळतात. यांनी त्या त्या पंथात आपल्या वाङ्मयाचे महत्त्वाचे स्थान प्राप्त केलेच त्याचबरोबर स्त्रियांच्या अन्यायाला वाचा फोडली. त्यात महत्त्वाची कामगिरी

बहिणाबाईची दिसून येते. या समर्थ स्त्रियांनी स्त्रीवादी विचारसरणीची छोटीशी पाऊलवाट निर्माण केलेली दिसून येते.

धार्मिक क्षेत्रात स्त्रियांची कामगिरी दिसतेच त्याचप्रमाणे राजकारणामध्येही स्त्रियांचा सहभाग मोठ्या प्रमाणात दिसून येतो. शिवकाळापासून जिजाबाई, ताराबाई, राजारामाची सून जिजाबाई, दर्याबाई भोसले, उमाबाई दाभाडे, दर्याबाई निंबाळकर इ. स्त्रिया राजकारणात सक्रिय होत्या. अहिल्याबाई होळकर, राणी लक्ष्मीबाई या नावांचीही त्यात समावेश होतो.

२० व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतीय राजकारणात स्त्रियांचे वर्चस्व जाणविण्यासारखे आहे. जगातील पहिली महिला पंतप्रधान भारतीय आहे. निरनिराळ्या ठिकाणी उच्च पदावरही अनेक महिला दिसतात. तसेच ३३ टक्के आरक्षणही मिळविलेले दिसते. याची सुरुवात मध्ययुगीन इतिहासातच झाली आहे असे म्हणता येईल.

स्त्री शिक्षणाविषयी जाणीवजागृती निर्माण होवू लागली तेव्हा सुधारक मंडळी आपल्या परीने त्या कार्यात सहभागी होऊन हातभार लावू लागली. महाराष्ट्रात पं. रमाबाई, ताराबाई शिंदे, सावित्रीबाई फुले, रमाबाई रानडे यांनी तर कार्य केलेच तसेच कर्वे, पार्वतीबाई आठवले, मालतीबाई पटवर्धन, गोदावरी परुळेकर, अनुताई वाघ, मेघा पाटकर यांच्या पर्यंत लोण पसरलेले आहे.

तसेच काशीबाई कनिटकर, शांता नाशिककर, मुक्ताबाई दीक्षित, कृष्णाबाई मोटे, मालतीबाई बेडेकर यांनी आपल्या साहित्यातून स्त्रीजीवन प्रकट केले.

भारताच्या स्वांतत्र्य चळवळीत स्त्रिया मोठ्या संख्येने सहभागी झालेल्या दिसून येतात, सरोजिनी नायडू, कमलादेवी चट्टोपाध्याय, अरुणा असफअली या स्त्रियांनी तर नेतृत्वशक्तीचे प्रदर्शन केले.

अनेक प्रकारचे निर्बंध असूनही आणि सामाजिक परिस्थिती प्रतिकूल असताना भारतीय स्त्रियांनी आपआपल्या काळात अनेक महत्त्वाच्या घडामोडीमध्ये भाग घेतलेला दिसून

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

येतो. भारतीय स्त्रीच्या जागृतीसाठी, हितासाठी तिच्या हितसंबंधाच्या रक्षणासाठी पाश्चात्त्य स्त्रीवाद जसाच्या तसा न घेता त्याच्या भारतीय परिस्थिनुसार, सामाजिक परिस्थिती नुसार स्त्रियांची मानसिक धारणा व परंपरा यानुसार स्वीकार केला पाहिजे. यांची स्पष्ट कल्पना सुमा चिटणीस यांना आली. भारतीय स्त्री व अमेरिकन स्त्री यांच्या प्रवृत्तीमध्ये फार तफावत आहे याविषयी डॉ. चिटणीस म्हणतात-

"या दोन प्रवृत्तीमधील फरकाचे मूळ कोठे आहे ? कदाचित ते भारतीय स्त्रीच्या स्वभावात असू शकेल. भारतीय स्त्री तुलनेत मुक्त असलेली, स्वतंत्र वृत्तीची, भारतीय स्त्रीसुद्धा विरोधी परिस्थिती निर्माण झाली तर तिच्या बाजूने वळसा घालून पुढे जाते. विरोध अंगावर न घेता हळूहळू अडचणी दूर सारीत मार्ग काढते. विरोधाला सामावून घेते. उघड निषेध तिला आवडत नाही असे असू शकेल काय, की हे वैशिष्ट्य भारती मानसिकतेचा, हिंदू तत्त्वज्ञानाचा आणि जीवनपद्धतीचा भाग असू शकेल ? हे जर खरे असेल तर स्त्रियांचे हक्क मिळविण्यासाठी आणि त्यांचा दर्जा उंचावण्यासाठी जे मार्ग धुंडाळावे लागतील, ते भारतीय संस्कृतीच्या चौकटीतच अधिक यशस्वी होण्याची शक्यता आहे का? त्यामध्ये समोरासमोर टोकाच्या संघर्षाला स्थान नसेल संस्कृतीच्या संदर्भातील फटी जागा व संधी यांचा कायदा घेऊन पारंपरिक लक्ष्मणरेषा हळूहळू पुढे ढकलत आणि अधिकाधिक स्त्रीस्वातंत्र्य मिळवत या चळवळीला जावे लागले. समाजाला स्त्रीची भूमिका कितपत पटेल, कितपत रुचेल याचा अंदाज घेत जावे लागेल, असे माझ्या मनात आले."[१७]

भारतीय इतिहासातील स्त्रीमुक्तीची परंपरा आजच्या स्त्रीवाद्यांनी स्वत:च्या वैचारिक व कृतीशीलतेला जोडून घेणे हे भारतीय स्त्रीवादाचे प्रधान सूत्र म्हणता येईल. ज्या ग्रंथामुळे, रूढी-प्रथांमुळे स्त्रीला जाणीवपूर्वक बांधले गेले त्यातून तिची सुटका झाली पाहिजे. हे काम भारतीय स्त्रीवादाने पोथीनिष्ठा व ग्रंथप्रमाण्याला नकार देऊन केले पाहिजे. स्त्रीने वैज्ञानिकता जोपासून स्वत:चा विकास केला पाहिजे. तसेच जोडीदार निवडण्याचा अधिकार तिला दिला

पाहिजे. 'चूल व मूल' हे कार्यक्षेत्र केवळ स्त्रियांचे न राहता त्यामध्ये स्त्री पुरुषांचा परस्पर सहभाग असला पाहिजे. स्त्रीला तिच्या हक्काची जाणीव ही असली पाहिजे.

साहित्यामध्ये स्त्रीची बदलती मानसिकता, जाणीव जागृती पुरुषाचा बदलता दृष्टीकोन याचे चित्रण करणे गरजेचे आहे. तसेच विवाहसंस्था व कुटुंबव्यवस्थेतील जाचक बाबी नाकारुन भारतीय संदर्भात होणारे वर्तन साहित्यातून मांडायला हवे. स्त्रीचे म्हणून खास अनुभव, भावना, भाषा यांना वाङ्मयीन रूप दिले पाहिजे.

भारतीय स्त्रीवादाचे एकच एक रूप गृहित धरणे चुकीचे ठरेल. भारतीय स्त्रीवादाच्या नवनवीन प्रवाहाला समजून गती दिली पाहिजे.

एकंदरीत असे म्हणता येईल की – 'भारतीय स्त्रीवादातील निरनिराळ्या चळवळींनी एकत्र येऊन परस्पर सहाकार्याने ध्येय प्राप्त करुन घेऊन भारतीय संदर्भातील हितकारक बाबींचा स्वीकार करीत स्त्रीला 'माणूस' म्हणून जगण्याच्या आड येणाऱ्या प्रत्येकबाबींना बाजूला सारून नकार देणारी एक विचार प्रणाली म्हणजे भारतीय स्त्रीवाद होय.''

## मराठीतील स्त्रीवाद :-

आजही आपल्या समाजव्यवस्थेत स्त्रीला 'चूल व मूल' यात अडकविण्यात येते. कुटुंबसंस्था हा भारतीय समाजजीवनाचा घट्ट पाया असला तरी, त्यामधील जबाबदाऱ्या व कष्ट हे स्त्रियांसाठीच असतात. त्यातून ती मुक्त व्हावी यासाठी सुधारकांनी अनेक प्रयत्न केले. स्त्रीशक्तीचा व स्त्रीमुक्तीचा डांगोरा पिटून बराच झाला तरी, अजून स्त्री आहे तिथेच आहे. चार–दोन बायकांनी स्वतंत्र जीवन जगले म्हणून याचा अर्थ संपूर्ण 'स्त्री' जात तशीच जगत आहे असा होत नाही. स्त्रियांना देखील पुरुषांप्रमाणे स्वत:चे आयुष्य स्वत: घडविण्याचा अधिकार आहे. केवळ स्त्री–पुरुषांमध्ये असलेल्या शारीरिक भेदामुळे स्त्रिया दुय्यम झाल्या नाहीत, तर इतिहासात व सद्यस्थितीत भिन्न समाजव्यवस्थानी स्त्री–पुरुषांच्या

शारीरीक भिन्नतेला जे अर्थ दिले त्यामुळे स्त्रियांची दडपणूक होते. या तात्त्विक पायावरच स्त्रीवाद आधारलेला आहे. असे आपल्याकडे मान्य केलेले दिसते. आता प्रश्न असा आहे की स्त्री सुधारणाविषयी विचाराचे प्रतिबिंब साहित्यात किती प्रमाणात पडते. ही परिस्थिती लक्षात घेऊनच मराठीतील स्त्रीवादाचा परामर्श घ्यायला हवा.

मराठी साहित्यावर चळवळीचा झालेला परिणाम व त्यातून निर्माण झालेले मराठीतील स्त्रीवादी साहित्य हे जाणून घेण्याआधी आपणास महाराष्ट्रातील स्त्रीचळवळीविषयी जाणून घेणे आवश्यक आहे. कारण महाराष्ट्रातील स्त्रीचळवळीने स्त्रीशिक्षणाची चळवळ, स्त्री अत्याचार विरोधी चळवळ, स्त्री-मुक्ती चळवळ अशा अनेक भूमिकेतून येथील समाजजीवनावर आपला ठसा उमटविण्याचा प्रयत्न केला आहे.

## महाराष्ट्रातील स्त्रीचळवळ :-

'भारतीय स्त्रीवाद' या मुद्यामध्ये आपण पाहिले की, धर्म-परंपरा-रुढी यांनी पुरुष श्रेष्ठत्व व स्त्रियांचे गौणत्व मोठ्या प्रमाणात वाढवित नेले व स्त्री-पुरुषामध्ये विषमतेची दरी निर्माण केली. समाजात मिळणारे दुय्यमत्व, अन्याय, लैगिंक शोषण, दडपणूक जणू स्त्रियांच्या जीवनाचा महत्त्वाचा भागच आहे. अशी परिस्थिती अव्वल इंग्रजी काळापर्यंत तशीच होती. इंग्रजी राजवटीत अनेक सुधारकांनी विधवापुनर्विवाह, चालीवर बंदी केशवपन बंदी, बालविवाह बंदी, स्त्री शिक्षणावर भर असे अनेक प्रश्न हाती घेऊन भारतीय स्त्री चळवळीचा प्रारंभ झाला.

समाजातील स्त्रियांची स्थिती सुधारली नाही तर समाजजीवन गतिशील होणार नाही या जाणिवेतून प्रामुख्याने पुरुषांच्या अनुकंपेतून जन्माला आलेली स्त्रीदास्य विमोचनाची चळवळ असे एकोणिसाव्या शतकातील स्त्रीचळवळीचे स्वरुप होते. या अशा चळवळीत सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई, आनंदीबाई जोशी, ताराबाई शिंदे, रमाबाई रानडे,

काशीबाई कनिटकर या स्त्रियांनी आपले योगदान दिले. या चळवळीतून अनेक बाबतीत यश आले जसे विधवा विवाह, लग्नाच्या संमतिवयात वाढ, स्त्री शिक्षण. पण पुरुषप्रधानतेला आव्हान मात्र मिळाले नाही.

## स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील स्त्रीचळवळ :-

स्वातंत्र्यपूर्व काळात महाराष्ट्रात सुधारणा चळवळीत लोकहितवादी, बाळशास्त्री जांभेकर, विष्णूशास्त्री पंडित यांनी विधवा पुनर्विवाहाबद्दल समाजात अनुकूल मत निर्माण व्हावे याचा प्रयत्न केला. लोकहितवादीनी शतपत्रातून स्त्रियांच्या अनेक प्रश्नांना हात घातला. बाळशास्त्री जांभेकरांनी 'दर्पण' व 'प्रभाकर' मधून तर विष्णुशास्त्री पंडितांनी 'इंदुप्रकाश' मधून विधवाविवाहाच्या समर्थनावर लेख लिहिले. या प्रयत्नातून १८५६ मध्ये विधिमंडळात पुनर्विवाहाला मान्यता देण्याचा ठराव संमत झाला. १८८१ ला संमतिवयाचा कायदा झाला. सुधारकांनी या कायद्याच्या आधारे स्त्री-प्रश्नांवर प्रकाश टाकल्यामुळे सुशिक्षित समाजाचे स्त्रीसुधारणा चळवळीकडे अधिक लक्ष वेधले.

म. फुल्यांनी स्वत:च्या पत्नीला सावित्रीबाई फुले यांना बरोबर घेऊन १८४८ मध्ये पुण्यात मुलीची पहिली शाळा काढली. अस्पृश्यांच्या मुलामुलींसाठी ही त्यांनी शाळा काढली. त्यांनी अस्पृश्यांप्रमाणे स्त्रियांचा दर्जा उंचविण्यासाठी सातत्याने प्रयत्न चालविले. त्यांना 'बालहत्या प्रतिबंध गृह', 'अनाथ बालकाश्रम' तसेच, 'विधवा पुनर्विवाह परिषद' याची स्थापना केली यामुळे समाजाचा रोष त्यांना पत्करायला लागला, पण त्यांनी आप्ले कार्य चालूच ठेवले.

म. फुल्यांचे हे काम पुढे पंडिता रमाबाई १८८९ ला मुंबईत 'शारदा सदन' व १९०० 'मुक्तीसदन' ही बालविधवांसाठी वसतिगृह असणारी संस्था स्थापन करुन चालू ठेवले. हिंदूधर्माने नाकरलेली समानतेची व माणुसकीची वागणूक त्यांना दिली. १८८२ मध्ये आलेल्या

'हंटर' कमिशनला स्त्री-शिक्षणाची गरज, स्त्री-शिक्षकांची नेमणूक, स्त्रियांना वैद्यकीय महाविद्यालयातून प्रवेश मिळणे, वगैरेचा आग्रह रमाबाईंनी धरला. स्त्री-शिक्षणाचे व स्त्रीमुक्तीचे कार्य करण्यात पं. रमाबाईचे योगदान फार मोठे आहे.

महर्षी धोंडो केशव कर्वे यांना महाराष्ट्रातील स्त्रीशिक्षणाच्या प्रसाराचे श्रेय द्यायला पाहिजे. १९८९ ला अनाथ बालिका श्रमाची स्थापना करुन त्यांनी आपल्या कार्याला सुरुवात केली. भारतातील पहिले महिला विद्यापीठ त्यांनीच स्थापन केले. विधवा पूनर्विवाह परिषद स्थापून विधवा स्त्रियांना शाळा, आश्रम व वसतिगृह असणारे महिला महाविद्यालयाची स्थापना केली. स्वत: ही आनंदीबाई या बालविधवेशी पुनर्विवाह केला व त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य स्त्रीशिक्षण कार्यासाठीच वाहिले.

विसाव्या शतकात महात्मा गांधीच्या नेतृत्वाखाली अनेक स्त्रियांनी स्त्री-चळवळीत भाग घेतला. तरी मूलत: स्त्रियांच्या प्रश्नांना तेव्हाही वाचा फुटली नाही. स्त्रियांना चळवळीत नेतृत्व करण्याचे स्वातंत्र्य मिळाले असले तरी अजून स्त्री-पुरुष समानता कुठेही दिसून येत नव्हती. यामध्ये स्त्रिया एकत्रित आल्या पण त्या स्त्री प्रश्नांसाठी नाही तर देश स्वातंत्र्यसाठी. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर मात्र त्या मागे ढकलल्या गेल्या. १९३७ साली 'राष्ट्रसेविका समिती' ही हिंदुत्ववादी विचारांची स्त्री-संघटनेची स्थापना झाली. तसेच १९५४ मध्ये 'भारतीय महिला फेडरेशन' ही साम्यवादी विचारांची स्त्री-संघटना स्थापन झाली.

१९२० ते १९४७ हा कालखंड स्त्रीचळवळींच्या दृष्टीने निर्णायक ठरलेला दिसतो. या काळातील स्वातंत्र्य आंदोलनात स्त्रियांनी ही राष्ट्राचा नागरिक या नात्याने स्वातंत्र्याच्या चळवळीत भाग घेतला पाहिजे ही भूमिका मांडली. १९३० च्या दांडीयात्रेत, पिकेटिंगमध्ये, सत्याग्रहात, कायदेभंगाच्या चळवळीत, स्त्रियांनी अहमिकेने, मोठ्या संख्येने भाग घेतला. ''या काळात जणू नवी भारतीय स्त्री जन्माला आली.'' असे गांधीवादाचे अभ्यासक डॉ. पांढरीपांडे म्हणतात.[१८]

या काळात स्त्रिया घराबाहेर पडून निर्भतेने सार्वजनिक जीवनात योगदान देण्यासाठी पुढे आलेल्या दिसतात. या स्त्रियांनी जुन्या परंपरा मोडून अबला-दुबळ्या गणल्या जाणाऱ्या आपल्या व्यक्तिमत्त्वातील आत्मशक्तीचे दर्शन घडविलेले दिसून येते. एकंदरीत स्वातंत्र्यपूर्ण कालखंड स्त्रियांच्या जागृतीला प्रेरक ठरलेला काळ आहे. या काळात स्त्रियांनी राजकीय चळवळीत भाग घेतलाच, शिवाय सामाजिक, शैक्षणिक, कला, साहित्य व विज्ञान अशा अनेक क्षेत्रात स्वत:ची क्षमता सिद्ध करुन दाखविली. देशाच्या स्वातंत्र्याला लवकर सामोरे जाऊ पाहणारी ही त्या काळातील 'स्त्री' निश्चितच स्वत्त्वाची जाणीव निर्माण होत गेलेली आणि अन्यायविरूद्ध झगडण्यास सिद्ध होत गेलेली दिसून येते.

## स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्रीचळवळ :-

स्वातंत्र्यप्राप्ती नंतर कुंठित झालेला स्त्री चळवळीचा प्रवाह १९७५ नंतर पुन्हा प्रवाही झाला. स्वातंत्र्योत्तर भारतात सुरवातीच्या २५ वर्षाच्या काळात स्त्रियाचा सहभाग हा महिलामंडळे व महिला परिषदांकरता मर्यादित राहिला. 'स्वातंत्र्य' हे उद्दिष्ट पूर्ण झाल्यावर स्वातंत्र्य चळवळ संपली त्यामुळे स्त्रीला सामाजिक व राजकीय जीवनात सहभागाची संधी देणारे मोठे दालन बंद झाले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सत्तेचे राजकारण आल्यामुळे स्त्रिय साठी ते प्रतिकूल आहे असे मानून ज्या महात्मा गांधीनी स्त्रियांना चळवळीत सहभाग वाढविण्यास सहाय्यता केली. तेच शेवटी स्त्रियांच्या सहभाग कमी होण्यासाठी कारणीभूत ठरले.

१९६० नंतर स्त्रीमुक्तीचे वारे वाहू लागले ते वारे भारतातही येऊन पोहचले त्याच्या मार्फत पाश्चात्त्य स्त्रीवादाचा परिचय भारतीय स्त्रियांना झाला. १९७५ हे वर्ष जागतिक 'महिला वर्ष' म्हणून जाहीर झाले. त्यावेळी 'स्त्रीवाद' हा शब्द फारसा प्रचलित नव्हता.

स्त्री चळवळीचे लोण महाराष्ट्रापर्यंत पोहचले. महाराष्ट्रातील सामाजिक चळवळीला एक वेगळे परिमाण देण्याचा, वेगळी दिशा देण्याचा प्रयत्न स्त्रीचळवळ करीत होती. स्त्रियांचा

व्यापक सहभाग असलेले १९७२ मधील 'महागाई विरोधीचे आंदोलन' हे स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रातील पहिले आंदोलन, त्यानंतर १९७६ च्या ऑक्टोबर मध्ये पुण्यात 'स्त्री मुक्ती संघर्ष परिषद' या नावाने दोन दिवसांची परिषद भरविली गेली. याला अतिशय चांगला प्रतिसाद ही मिळाला. स्त्रियांचे विविध प्रश्न घेऊन त्यावरील ठराव करणे असे त्याचे स्वरुप होते. त्यामध्ये आदिवासी व शेतमजूर स्त्रियांची संख्या अधिक होती. यापरिषदेच्या यशस्वीते नंतर याची प्रेरणा घेऊन मुंबईची स्त्रीमुक्ती संघटना व पुण्याची पुरोगामी महिला संघटना जन्माला आल्या. यात सुशिक्षित स्त्रिया व मध्यमवर्गीय स्त्रिया तसेच डाव्या विचारसरणीच्या स्त्रिया एकत्रित आल्या.

## नियतकालिकांचे महत्त्व :-

स्त्रीमुक्ती परिषदेतून स्त्रियांना कार्याची नवीन प्रेरणा मिळाली. त्यातून स्त्री-संघटनांची स्थापना झाली. या स्त्रीमुक्ती परिषदेची आणखी एक फलश्रुती म्हणजे १९७७ च्या जानेवारी मध्ये 'बायजा' द्वैमासिकाची सुरुवात सौदामिनी राव यांनी स्त्रियांसाठी मोठ्या ध्येयाने सुरुवात केली. विद्या बाळ नवीन दृष्टीकोनातून 'स्त्री' चे संपादन करु लागल्या. १९७९ मध्ये पुण्यात सौदामिनी राव यांच्या पुढाकाराने 'स्त्रीमुक्ती आंदोलन समिती' स्थापन झाली. 'स्त्री-उवाच', 'मैत्रीण', 'नारी समता मंच-पुणे', 'स्त्री अन्यायविरोधी-औरंगाबाद', 'महिला दक्षता समिती- कोल्हापूर', 'महिला हक्क नाशिक' इ. स्त्रियांच्या संघटना व कार्य करणारे गट अस्तित्वात आले. हुंडा, बलात्कार यासारख्या अन्यायाविरूद्ध लढण्यासाठी हुंडाविरोधी संरक्षण समितीची स्थापना झाली. या सर्व परिषदेतून स्त्रियांमध्ये वैचारिक आदानप्रदानाला प्रारंभ झाला. काळाच्या गरजेतून स्त्रियांची नियतकालिके प्रसिद्ध होऊ लागली.

स्त्रियांचे मानसिक उद्‌बोधन, जागृती करीत, स्त्रियांना काळाचे भान देत, स्त्री प्रश्नांची चर्चा आणि स्त्रियांचा विचार मांडण्यासाठी खुले व्यासपीठ अशा विविध रुपांनी मराठी

नियतकालिकांनी स्त्रियांना पूरक साथ दिली. स्त्रियांच्या लेखनामध्ये फार मोठा वाटा नियतकालिकांचा दिसून येतो. स्त्रिया शिक्षित होऊन या क्षेत्रात आत्मप्रेरणेने लेखन व संपादन या दोन्ही भूमिकेतून कार्य करू लागल्या. मुलींच्या शिक्षणाकडे लक्ष वेधून घेणारे 'सुमित्र' - १९५५ हे पहिले स्त्री नियतकालिक मुंबईत प्रसिद्ध झाले.

१९ व्या शतकात माणिकबाई लाड यांनी 'आर्यभागिनी' १८८९ हे नियतकालिक पहिले स्त्री संपादित व स्त्रीनेच प्रकाशित केलेले म्हणून महत्त्वाचे आहे. या नियतकालिकाला अन्य नियतकालिकांनीही पूरक साथ दिली. काळाबरोबर नियतकालिके व स्त्रियांचे नाते विकसित होत गेले. नियतकालिकांनी स्त्रियांना अनेक प्रकारे मदत केली. विविध विषयांची माहिती देत त्यांनी स्त्रीशिक्षण, विधवाविवाह इ. सामाजिक प्रश्नांच्या संदर्भात जागृती करुन स्त्रियांची भाषिक तयारी करुन घेत स्त्रियांना लेखनाला प्रवृत्त करण्याचे काम नियतकालिकांनी केले.

'गृहलक्ष्मी' (१९२७), 'नवी गृहलक्ष्मी' (१९३४), 'महिला' (१९३३), 'भगिनी' (१९४१), 'वनिताविश्व' (१९४८) महत्त्वाचे म्हणजे 'स्त्री' १९३० इ. नियतकालिकांनी स्त्रियांच्या ज्ञानकक्षा विस्तृत केल्या. स्त्रियांना जाणीव जागृतीचे भान केवळ राष्ट्रीय पातळीवर न देता आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत देण्याचा प्रयत्न या नियतकालिकांनीच केला.

स्त्रियांची मानसिक तयारी करुन तिच्यात आत्मविश्वास निर्माण करणे व सुशिक्षित स्त्रियांना लेखनाला व वाचनाला प्रवृत्त करणे हाच हेतू प्रामुख्याने नियतकालिकांचा असून तो साध्य झालेला ही दिसून येतो. कारण लेखनाची कोणतीही पूर्व परंपरा नसताना स्त्रिया लिहू-वाचू लागल्या. यातून जी कमीपणाची भावना स्त्रियांच्या मनात घर करुन होती. ती हळू हळू कमी होत गेली. त्याचाही प्रत्यय या लेखनातून दिसून येतो.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर स्त्रीचळवळींना, स्त्रीप्रश्नांना हळुवारपणा आला. नियतकालिकांच्या विश्वात ही रंजनवादाकडे झुकणाऱ्या नियतकालिंकाचा प्रवाह सुरु झाला. तेव्हा रंजनवादाकडे न झुकता आपला मार्ग निष्ठेने स्वीकारला. आपल्या ध्येयवादाप्रमाणे काम चालू

16796

ठेवले. १९३० मध्ये शंकरराव किर्लोस्कर यांच्या संपादनाखाली 'स्त्री' मासिकाने आपले कार्य सुरु केले. पुढे मुकुंदराव किर्लोस्कर, सौ. शांताबाई किर्लोस्कर यांनी 'स्त्री' चे कार्य निष्ठेने चालू ठेवले. 'स्त्री'-पुरुष संबंधात कितपत मोकळेपणा असावा', 'लग्नाच्या प्रश्नात शिक्षण आड येते का ?', गर्भपाताला वैद्यकीय पार्श्वभूमीवर १९७२ मध्ये कायदेशील मान्यता मिळाली. या महत्त्वाच्या विषयावर 'स्त्री' मासिकांनी १९६५ मध्येच गर्भपातास संमती द्यावी का ? या विषयावर परिसंवाद घडवून आणला. नियतकालिकांमध्ये महत्त्वाचे कार्य संपादकाचे असते. ते कार्य श्री. मुकुंदराव किर्लोस्करांनी खुबीने केले.

'स्त्रीला आत्मशोधनाची प्रेरणा देणारी एक चळवळ आहे. ही चळवळ स्त्रीला तिच्या मर्यादित कार्यक्षेत्रातील अनुभवापासून ते थेट आजपर्यंत बंद असणाऱ्या कार्यक्षेत्रापर्यंत पोहोचण्याची संधी देऊ पाहते. ज्या जबाबदाऱ्या विज्ञाननिष्ठ आणि बुद्धिसाठी दृष्टीकोनातून पेलण्याचं सामर्थ्य ही चळवळ देऊ इच्छिते, यासारख्या विविध प्रकारच्या विकासातील नव्या जाणीवा तिला होऊ लागल्या की लगेच लोकांना वाटतं, 'बघा स्त्रीमुक्ती चळवळीचे परिणाम ? आता बायका घराबाहेर पडून पुरुषांना घरात बसविणार ! वास्तविक या चळवळीच्या आधारानं स्त्रीचा विकास होतो आहे, ती शहाणी होत आहे. शहाणा माणूस शेजारच्या बरोबरीच्या माणसाला किती काळ वेडं ठेवून स्वत: छळ सोशील ? पण शहाणा होण्याचे कष्ट असतात ते नकोसे वाटणारे लोक त्यात विसंगती शोधतात. त्याची 'खूळं' म्हणून टर उडवतात, आणि काय, काय, करतात.'[१९]

'स्त्री' ने १९७५ ला महिला वर्षाचे स्वागत करता 'स्त्रीचं आजचं स्थान' या विषयावर जानेवारी १९७५ पासून क्रमश: लेखनमाला सुरू केली. तसेच फ्रेंच लेखिका सिमॉन द बोव्हा हिच्या 'द सेकंड सेक्स' आणि 'नेचर ऑफ द सेकंड सेक्स' या पुस्तकांचा अनुवाद 'बायकांचा जन्म' या शीर्षकाने १९७४ पासून 'स्त्री' मध्ये प्रसिद्ध केला.

१९७७ मध्ये सौदामिनी राव यांनी 'बायजा' द्वैमासिक सुरू करून स्त्रीवादी नियतकालिकांचा नवा प्रवाह सुरु केला. 'बायजा' च्या पाठोपाठ १९७८ मध्ये 'महिला

आंदोलन पत्रिका' (संपा. मीनाक्षी साने) हे नियतकालिक सुरू झाले. १९८६ मध्ये स्त्रीमुक्ती संघटनेने आपले मुखपत्र सुरू केले. 'प्रेरक ललकारी' (संपा. शारदा साठे), १९८७ मध्ये समविचारी स्त्रियांचा एक गट तयार झाला. छाया दातार, विद्या बाळ, नीरा आडारकर, विनया खडपेकर, माधुरी गोखले इ. स्त्रियांनी एकत्रित येऊन 'स्त्री उवाच' हे वार्षिक सुरू केले. १९८९ पासून विद्या बाळ यांनी स्वतःचे मासिक 'मिळून साऱ्याजणी' सुरु केले. यशोधरा महिला मंडळाच्यावतीने 'आम्ही मैतरणी' (संपा. मिनाक्षी मून) हे त्रैमासिक सुरू झाले.

या सर्व नियतकालिकांचे वैशिष्ट्य म्हणजे ही स्त्रियांनी संपादित केली आहेत. काही वैयक्तिक पातळीवर तर काही सामूहिकरित्या संपादित केलेली आहेत. एक आत्मप्रेरणेने पछाडलेली नवी पिढीच समोर आली. स्त्रीप्रश्नांचा विचार आणि स्त्रीवरील अन्यायाविरूद्ध आवाज उठविणाऱ्या या नियतकालिकेत एक समान धागा दिसून येतो तो त्यांच्या उपशीर्षकांतून.

१) 'स्त्रीयांच्या प्रश्नावर समाजाचे प्रबोधन करणारे एकमेव मासिक'–बायजा

२) 'एकमेका साह्य करु । समाजवाद साकार करु ।।''– महिला आंदोलन पत्रिका

३) 'पद्दलितांची पिळवणुकीतून सुटका व्हावी हा एकच ध्यास मनी घेऊन आपण निर्मू आपला नवा समाज'– प्रेरक ललकारी.

४) 'स्वतःशी नव्याने संवाद करणारे मासिक'– मिळून साऱ्याजणी.[२०]

सर्व नियतकालिके एकाच प्रेरणेने निर्माण झाली असली तरी प्रत्येक नियतकालिकांचे वेगळेपण ठसठशीत होते. छाया दातार, कुमुद पावडे, ज्योती लांजेकर, ज्योती म्हापसेकर, नीलम गोऱ्हे, लता जाधव, सौदामिनी राव, विद्या बाळ, मुक्ता मनोहर, शारदा साठे, सौदामिनी ब्रह्मे, उर्मिला पवार, मीनाक्षी मून, अमरजा पवार, मालिनी तुळपुळे, रझिया पटेल इ. स्त्रीवादी लेखिका, संपादिकांची फळीच स्त्रीवादी नियतकालिकांनी विकसित केली.

## मराठी साहित्यातील स्त्रीवाद :-

जग परिचित आहे की, एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत स्त्रियांना हेतूपुरस्सर शिक्षणापासून दूर ठेवण्यात आले. महात्मा जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या अथक प्रयत्नांमुळे स्त्रियांना शिक्षणाचा मार्ग खुला झाला. अनेक संकटांना तोंड देऊन त्यांनी आपले काम निष्ठेने केले. अपमानास्पद वागणूक सहन करुन देखील धैर्याने आपली वाट चालत राहिल्या. आज त्याच्यामुळेच आपण स्त्रिया थोडाफार तरी मोकळा श्वास घेऊ शकत आहोत.

स्त्रीने हातात कागद-लेखणी धरणं म्हणजे जणू महापातकच घडलं असं मानण्याचा काळ फार दूरचा नाही. अवघ्या शंभर-सव्वाशे वर्षापूर्वी ज्या स्त्रिया लिहू लागल्या त्यांना त्याच्या स्वत:च्या घरातून तसेच समाजातून प्रचंड विरोधाचा सामना करावा लागला. तरीही काशीबाई कानिटकर, ताराबाई शिंदे, मालती बेंडेकर स्वतंत्रपणे लेखन करु लागल्या. यांच्या लेखनातून स्त्रीवादी जाणीव निर्माण झाली. पण त्यावेळी 'स्त्रीवादी' ही संज्ञा प्रचलित नव्हती. तसे पाहिले तर स्त्रीवादी साहित्याचे मूळ प्राचीन काळापर्यंत जाऊन पोहचते. अगदी भाषेच्या आरंभीच्या काळापासून स्त्री आपल्याशीच किंवा आपल्या सारख्याच दुसरीशी चाललेल्या संवादातून 'बाई-असण्याचा', 'बाईपणाचा' अर्थ व्यक्त करीत आली आहे. हे मराठीतील लोकगीतांच्यास्वरातून ऐकू येते. अन्याय, बंधने, शिक्षा, दंड, तक्रार, शोषण, पुरुषांकडून मिळणारी वागणूक, अवहेलना, उपाय, इजा आपल्या हातून चूक घडेल का ? याची धास्ती इ. स्त्रियांच्या अनुभव विश्वाच्या कक्षेतील अनेक भावना आणि तथ्ये यांनी शद्बांकित केलेली दिसतात. खऱ्या अर्थाने स्त्रीवादी साहित्य कशाला म्हणतात ? तर स्त्रियांविषयीचे आणि स्त्रियांनी निर्माण केलेले साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य म्हणून मग दळता-कांडताना स्त्रियांनी शतकानुशतके जी गाणी म्हटली, रचली त्यातून स्त्रीवाद प्रकट होतो. ही स्त्रीवादी जाणीव आपल्याकउे पाश्चात्य "Geminism" वरुन आलेली दिसत असली तरी ती जाणीव आपल्या साहित्यातून खूप आधीपासून आढळते.

## प्राचीन वाङ्मयातील स्त्रीजाणीवा :-

आपण सिंहावलोकन केले तर महाराष्ट्र संस्कृतीचा उदयकाळ मानल्या जाणाऱ्या यादवकाळापासून स्त्रीचे अत्यंत हालाकीचे, कष्टमय आणि अधिकाधिक दुय्यमतेचे जीवन सुरु झालेले दिसून येते. जैन, बुद्ध, शैव, वैष्णव, नाथ, लिंगायत, महानुभाव, वारकरी या संप्रदायानी देशी भाषांच्या द्वारा वैदिक धर्मातील विषमतेला विरोध करुन सर्वसामान्य जनतेवर आपल्या शिकवणूकीचा पगडा बसविण्याचा प्रयत्न केला होता. महाराष्ट्रात खऱ्या अर्थाने महानुभाव आणि वारकरी या संप्रदायांनी भक्तिमार्गाने लोकजीवनाला सांस्कृतिक अधिष्ठान मिळवून दिले होते. महानुभाव पंथाने मध्ययुगीन काळात जातीभेद, लिंगभेद याला विरोध केला. अनेक स्त्रियांनी विशेषत: ब्राह्मण विधवा किंवा परित्यक्ता स्त्रियांनी पंथदीक्षा घेतली होती. चक्रधरस्वामीनी स्त्रीची 'माणूस' म्हणून गणना करुन व तिला पुरुषांबरोबरीचे स्थान दिले. तसेच महानुभाव पंथात तिला एका मर्यादेपर्यंत मोकळीक दिली व आध्यात्मिक अधिकाराचा मार्ग मोकळा केला होता. परंतु महानुभवांचा आचारधर्म अत्यंत बिकट होता. 'स्त्री' ही विषयवासनेस प्रवृत्त करणारी असल्यामुळे, 'चित्रीचीही स्त्री न पाहावी' असा दंडक होता. त्यामुळे स्त्रीविषयी, समानतेऐवजी द्वेषाची भावनाच निर्माण होत जाणे, मुलीचा जन्म म्हणजे पूर्वजन्मीच्या पापाचे फळ अशी समजूत वृद्धिगंत होत जाणे व या समाजात स्त्रियांना स्वत:च्या दडपणुकीची जाणीवही न होणे अशक्य नाहीच.

महानुभाव पंथाप्रमाणेच वारकरी संप्रदायाने स्त्रीशुद्रांची ही कोंडी फोडलेली दिसते. स्त्रीशोषण हे देवनिर्मित असून 'पुरुष' हा श्रेष्ठ व 'स्त्री' दुय्यम मानली. तसेच स्त्रीला परमार्थासाठी आणि विरक्तिसाठी ही स्त्रीच्या स्वातंत्र्याला नाकारणे या सर्व गोष्टींला विरोध करुन स्त्री–पुरुष असा भेद न मानता मनुष्य जातीला अध्यात्म व मुक्तीचा मार्ग वारकरी संप्रदायाने दाखविला होता. त्यापरंपरेत स्त्रिया आपली आत्ममुक्तीची वाट शोधू लागलेल्या दिसतात. त्यांच्या मार्गावर अनेक काटे होते. तिला परमार्थाचे स्वातंत्र्य नव्हतेच, तिचे मन प्रपंचातून विरक्त झाले तरी तिच्या देहावर प्रपंचाची जबरदस्ती होतीच म्हणून,

''स्त्रियेचे शरीर पराधीन देह ।

न चले उपाय विरक्तीचा।।''[२१] असे म्हणणाऱ्या संत कवयित्री बहिणाबाई दिसतात.

## लोकसाहित्य :-

भारताच्या कानाकोपऱ्यातून, डोंगरदऱ्यातून, नद्याखोऱ्यातून आणि धूळमाखल्या पठरावरुन गुंजणारी जात्यावरील ओव्यांची निर्मिती ही ग्रामीण स्त्रियांचा अविष्कार आहे. एकमेंकीच्या सहाय्याने म्हटल्या जाणाऱ्या या ओव्या म्हणजे पुरुषी समाजातील दडून राहिलेल्या मौखिक सर्जनाचा सांस्कृतिक ठेवाच आहे.

समाजात बोलायचे फक्त पुरुषाने अशावेळी स्त्रियांचा आवाज हा केवळ एकमेंकीसाठीच 'सांगते बाई तुला' असे म्हणत सर्वसामान्य बाया उत्स्फूर्तपणे आणि जवळीकीने एकमेकींना आपल्या भावभावना, आचार विचार सांगतात. साहित्यातील बहुतांशी भाग हा स्त्रीनिर्मित साहित्यानेच व्यापला आहे. त्यामुळेच या साहित्यात स्त्रीजीवनाचे प्रतिबिंब दिसून येते. स्त्रीची परवशता, दैवाधिनता आणि सर्जनशिलता तसेच तिचे वस्तूरुप लोकसाहित्यात यथायोग्य प्रतिबिंबीत झालेले आढळते.

अगदी मराठी भाषेच्या निर्मितीच्याही आधी, मागे जावून पाहिले तर जैन, प्राकृत भाषेतील स्त्रियांच्या गीतांचे उल्लेख मिळतात. तशीच काही साधर्म्य असणारी गीते लोकसाहित्यातही आढळतात. पुरुषप्रधान समाजात स्त्रीला मिळणारे गौणत्व आणि जन्माच्या आधीपासून मुलीच्या जन्माला मिळणारा नकार, मुलीच्या मातेची अप्रतिष्ठा, तिची अवहेलना यांचे पडसाद गीतांमधून, कथामधून म्हणी- उखाण्यांतून वारंवार दिसतात.

''देवा नारायणा माझी विनंती फार फार ।

जन्म बायकांचा नको घालूस वारंवार ।।''[२२]

अशा मुलीच्या जन्माला नकार देणाऱ्या शेकडो ओव्या सापडतात. याउलट कन्या जन्माचे कौतुक करणाऱ्या ओव्या क्वचित का असेना पण आढळून येतात.

''जोंधळ्यापरास मी ग वाढविते तुरी ।

लेकापरास मला लेक बाई प्यारी ।।''[२३]

मुलगी झाल्याचा आनंद असला तरी कन्या जन्माचा रागराग करणाऱ्याविषयी उमटलेला हा संतापजनक आणि उद्वेगजनक आवाज आहे. यातून प्रचलित समाजाच्या विरोधातला तो विद्रोहाचा आवाज आहे.

सामान्य स्त्रियांची दु:खे तर लोकसाहित्यातून दिसतात तसेच पौराणिक स्त्रियांची दु:खे लोकसाहित्यातून दिसतात. सीता,द्रौपदी, मंदोदरी यांना आपण पतिव्रता मानत असलो तरी या पिढ्यान्पिढ्यांच्या शोषित, अन्याय सहन करणाऱ्या, व्याकुळ, कष्टकरी भारतीय स्त्रीमनाचे प्रतिरूप आहेत. लोकगीतातून अनेकदा आपण त्याच्या पातिव्रत्याचे कौतुक ऐकतो स्त्रीमनातील अन्याय ही आपणास दिसून येतो.

उदा-

''सीता पतिव्रता नाही रामाला कळाली.

वनाच्या वाटेवरी, चाके रथाची गळाली.''[२४]

यातून एकपत्नीत्त्व व पुरुष सत्तेच्या प्रतिनिधी असलेल्या रामाची अन्यायीवृत्ती चव्हाट्यावर येते.

अशा प्रकारे स्त्रियांच्या लेखनातून त्याच्या मनात दडलेल्या भावना, स्वत:ची, सुखदु:खे, दबलेल्या जाणीवा लोकसाहित्यातून अभिव्यक्त झालेल्या दिसतात.

**कथा :-**

एकोणिसाव्या शतकाच्या आरंभी वैदिक वाङ्मय, रामायण–महाभारत इ. ग्रंथ, पुराणे यांमधून मूळ विषयाच्या आलेल्या कथा, बोधकथा, दैवतकथा, प्राणीकथा, जातककथा, कहाण्या, दृष्टान्तकथा, चित्रकथा इ. कितीतरी कथांची रूपे मावळून त्याऐवजी पाश्चात्त्य साहित्याच्या प्रभावामुळे स्फुट गोष्ट जन्माला आली, ती एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या कालखंडात !

स्त्रियांनी विपुल प्रमाणात कथालेखन करुन आपल्या भावनांना वाट मोकळी करुन दिलेली दिसते. १९२० पर्यंतच्या कालखंडात 'बिचारी आनंदीबाई' ही लेखिकेची पहिली उपलब्ध कथा असावी. या काळात सर्व नियतकालिकांचा स्त्रियांकडे व त्यांच्या प्रश्नांकडे पाहण्याचा दृष्टीकोण सहानुभूतीचा होता. सुवासिनी, लीला, काशीबाई हिर्लेकर, वामनसुता, लक्ष्मीतनया, हिराबाई पेडणेकर, ताराबाई तर्खड, लक्ष्मीबाई टिळक, काशीबाई देवधर, आनंदीबाई देशमुख इ. कितीतरी नावे कथालेखिका म्हणून झळकलेली दिसतात.

स्त्रीविषयक समस्यांचे भान, पुनर्विवाह, प्रौढविवाह, फॅशन वेड्या स्त्रीचे चित्रण, हे कथाविषय लेखिकेंनी निवडलेले दिसतात. 'हे चित्र पाहा व ते चित्र पाहा', 'प्रौढविवाह की बालविवाह', 'लीलाताईची फॅशन' या लक्ष्मीतनया यांच्या कथांतून ते विषय हाताळलेले दिसतात.

घराच्या चार भिंतीत सर्व बाजूनी स्त्रीच्या होणाऱ्या कोंडीमुळे त्या अस्वस्थ होत होत्या शिक्षण घेऊनही कर्तृत्वाला, व्यक्तिविकासाला पुरेशी संधी नाही. हेही त्यांना खुपत होते. पुरुषप्रधान, संस्कृतीत स्त्री उपेक्षिली जाते याची त्यांना खंत वाटत होती. 'स्त्री' हा त्यांच्या चिंतनाचा विषय होता. त्यामुळे १९२० ते ४० च्या कालखंडातील गिरिजाबाई केळकर, आनंदीबाई शिर्के, कमलाबाई टिळक, क्षमा राव, कृष्णाबाई, विभावरी, गीता साने, आनंदीबाई किर्लोस्कर, पिरोज आनंदकर, कुसुमावती देशपांडे इ. लेखिकांनी स्त्री–मनाचा शोध जाणीवपूर्वक घेतला आहे.

१९३३ साली विभावरी शिरूरकरांनी 'कळ्यांचे नि:श्वास' या कथासंग्रहातून प्रौढ कुमारिकांच्या मनातील ताणतणावांचे वर्णन केले आहे. स्त्रियांचा कोंडमारा करणाऱ्या प्रथा व रुढींवर प्रहार करणाऱ्या विषयांमध्ये कथाबीज शोधले. या शिरूरकरांच्या कथातून बंडखोरपणा जाणवतो. गौरी देशपांडे यांनी तर याही पुढचा टप्पा गाठला. १९४५ ते १९६० हा कालखंड कुसुमावती देशपांडे, वसुंधरा पटवर्धन, शिरीष पै यांच्या कथांचा होता. १९६० ते १९९० या कालखंडात शांता किर्लोस्कर–'डाक्याची साडी', कमल देसाई,– 'रिंग', विजया राजाध्यक्ष– 'अधांतर' व 'टिंब', सरिता पदकी– 'बारा रामाचं देऊळ', लीला श्रीवास्तव 'जखमा', वसुधा पाटील– 'जमुना के तीर', 'वंशाचा दिवा', सुनीती आफळे– 'कुंपणापलिकडच्या बकुळी बाभळी', छाया दातार – 'वर्तुळाचा अंत', निलिमा भावे – 'मांडियला खेळ', आशा बगे – 'मोरवा', छाया दातार (१९८५)– 'स्वत:ला शोधताना', सुमिती क्षेत्रमाडे– 'आहे हे असं आहे', निर्मला देशपांडे – 'गर्ल', सुधा सोमण त्यांचा 'समांतर', उर्मिला पवार– 'सहावं बोट', नीलम गोऱ्हे – 'उरल्या कहाण्या', सानिया – 'प्रतीती', उषा दातार त्यांची 'काचेची भिंत', व उर्मिला पवार 'चौथी भिंत' हे महत्त्वाचे कथासंग्रह प्रकाशित झालेले दिसतात.

स्त्रियांच्या कथांचे विषय प्रामुख्याने त्यांचे लग्न, त्यांचे शरीर, त्यांचे मन आणि त्यांची नोकरी या विषयावर आधारित असतात. बालविवाह, विधवा विवाह, पुनर्विवाह, पारित्यक्ता, विधवा, निसंतान स्त्रीचे दु:ख, वर निवडण्याचे स्वातंत्र्य नसणे, नावडता पती मिळणे. जुलमी पती मिळणे, त्याचे विवाहबाह्य संबंध असणे अशा विषयांना घेऊन अशा कथा लिहिलेल्या आढळतात, तशा पतीबरोबरच प्रियकर, मित्र, कार्यालयातील बॉस, प्रेम, निखळ मैत्री, विवाहबाह्य संबंध, कुमारी माता, लैंगिक सुख आदी विषयांवरही कथा लिहिलेल्या दिसतील.

कमल देसाई यांच्या 'रंग' ह्या कथेमध्ये अर्थार्जन करणाऱ्या प्रौढ कुमारिकांचे अनुभव विश्व आढळते तर नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे प्रश्न 'सुनीती आफळे' त्यांच्या 'तिढा' व 'गौरी देशपांडे' ह्यांच्या 'परंतु मुर्खाचे' ह्या कथामध्येही व्यक्त झालेले दिसतील. घरकामात स्त्रीला

मदत करणारे पती सानिया व गौरी देशपांडे यांच्या कथांमध्ये आढळतात. मुलाच्या संगोपनाच्या प्रश्नाला घेऊन 'विसंवाद' ही कथा विजया राजाध्यक्षांनी लिहिलेली आहे. अनिता ह्यांच्या कथांमध्ये लैंगिक अनुभव, कुमारी माता, कुटुंब नियोजनाच्या साधनाचा वापर, असे विषय येतात. वयात येणे, गर्भधारणा, गर्भपात, बाळंतपण, अशा शरीरकेंद्री अनुभवावरही लेखिकांनी कथा लिहिल्या आहेत. उर्मिला पवार त्यांच्या कथांमध्ये दलितांच्या दु:खांना वाचा फोडलेली दिसते.

**कविता :-**

'कविता' या वाङ्मय प्रकाराला मौखिक परंपरा आहे. आधुनिक काळात तिला लिखित परंपरा प्राप्त झाली. १९२० ते १९५० काळात कविता या गीतांच्या स्वरूपात प्रकट झाल्या. या कवितांचा विषय हा धार्मिक व कौटुंबिक भावनांनी युक्त होता. स्त्रीने आपली सुखदु:खे आशा-आकांक्षा, प्रथम व्यक्त केल्या त्या कवितेतून. १९५० पर्यंतच्या कालखंडातील प्रमुख व महत्त्वाची कवयित्री म्हणून संजीवनी मराठे यांचे नाव घ्यावं लागेल. शांता शेळके, लक्ष्मीबाई टिळक, बहिणाबाई चौधरी, इंदिरा संत यांच्या कवितातून स्त्रीवादी जाणीवा प्रकट झालेल्या दिसून येतात.

पतीबरोबर माहेर सासरच्या भावना जशा व्यक्त होतात, तशा प्रियकरासमवेतच्या भेटीगाठी, रात्रीची विविध रुपे, निसर्गाचे नाना अविष्कार, आठवणी, शपथा व सहवासातील उत्कट सुख:दुखाच्या स्मृती, दिली-घेतलेली वचने, प्रणयाने वेढलेली अतृप्त देहिक तडफड आणि विश्वासघाताने पाठ फिरवलेली फसवी क्षितिजे ह्यांची अनेक उत्कट आणि उग्र चित्रे स्त्रियांच्या कवितांमधून व्यक्त झालेली दिसतात. अत्यंत वैयक्तीक अशा तरल संवेदनरूप अनुभवातून ह्या कविता जशा व्यक्त झाल्या आहेत, तशा स्त्रीवर होणाऱ्या अन्यायाच्या निषेधातूनही.

''गावाच्या जत्रेत भरलेल्या

खुळखुळणाऱ्या बांगड्या.

आणि पारावर हुंदडणाऱ्या

झिपऱ्या पोरी विसरुन

बांधल्या दाव्याबरोबर

निघालीच नवरी

आता इथून पुढं

अगदी आत तिचे दिवस

राळून कोळ होईल दारावचं हिरवं तोरण

आणि पांगतील दाही दिशा

आंब्याच्या चाफ्यावर बसवलेले मनातले मोर,''[२५]

आपले 'मी' पण विसरून, गूंडाळून ठेवून, निर्भर, मुक्त असे कुमारवय ही स्त्रीच्या जीवनातून एकाकी. नाहीशी होणारी एक रम्य गोष्ट आहे. पुढे 'स्त्री' पणाच्या कामात अडकल्यावर त्या निर्भर वयाची आठवत येत राहते. त्यासाठी मन झुरु लागतं. त्या भावनाना कवितेतून वाट दिली जाते.

पद्मा गोळे, अनुराधा पोतदार, शिरीष पै, सरिता पदकी, पद्मा लोकर, सुशिल पगारिया, वृंदा लिमये, वासंती मुजुमदार, वसुधा भावे, अंजली ठकार, मल्लिका अमरशेख, सुनीता जोशी, सुमती लोंढे, अरुणा ढेरे, अनुराधा पाटील, शैला सायनकर, सिसिलिया काव्होला, नीरजा, प्रज्ञा लोखंडे, ललिता गादगे, सुरेखा भगत ह्या स्वातंत्र्योत्तर काळातील महत्त्वाच्या कवियित्री आहेत.

'वाळूचा प्रियकर'– मल्लिका अमर शेख, 'दिंगत'–अनुराधा पाटील, 'विवर्त' – प्रभा गणोरकर, 'एकोल'–संजीवनी खोजे, 'अरुपाची गंधगीत'– विजया संगवई, 'अंतरंग' – हेमा लेले, 'मनस्वी', 'मी एक स्त्रीजातीय अस्वस्थ आत्मा'– अंजली कुलकर्णी या कवितासंग्रहातून स्त्रीजाणिवा व्यक्त होताना दिसतात.

– मी माणूस –

''स्त्री देवी हे तर खोटं

स्त्री सखी हे ही खोटं

स्त्री सुंदर चलनी हुंडी

स्त्री म्हणजे नुसती कुंडी

स्त्री म्हणजे केवळ मांस

शिकाऱ्याच्या हातात फास

बाकी सारे मोहक भास''[२६]

– (नीहार) पद्‌मा गोळे

''नाही मी हो नसुती नार

पेजेसाठी लाचार

शेजेसाठी आसुसणार

नाही मी नुसती मादी

मी माणूस, माणूस आधी''[२७]

– (नीहार)

स्त्री ही एक माणूस आहे आणि ती माणूस म्हणूनच जगणार हा विचार पद्माताईंनी आत्मविश्वासाने मांडला आहे.

**कादंबरी : –**

सन १८७३ मध्ये साळुबाई तांबवेकर ह्यांनी लिहिलेली 'चंद्रप्रभा विरहवर्णन' ही पहिली कादंबरी आहे. तथापि १९५० पर्यंत स्त्रियांच्या कादंबरी लेखनाचे स्वरुप हे प्रबोधनपर असल्याचे जाणविते या कालखंडातील प्रमुख लेखिका म्हणजे गीता साने व विभावरी शिरुरकर होय.

स्त्री शिक्षणाचा पुरस्कार करणारी 'रंगराव' ही कादंबरी काशिबाई कानेटकर यांनी लिहिली, हुंडा पद्धतीला विरोध करणारी 'गृहलक्ष्मी' ही कादंबरी जानकीबाई देसाई, 'मुलाचे बंड' ही विधवांच्या समस्या मांडणारी कादंबरी –यशोदाबाई भट, तर हिंदू समाजतील तत्कालिन वाईट प्रथा आणि रुढींवर प्रहार करणारी 'हाच का धर्म' ही कादंबरी शांताबाई नाशिककर आणि घटस्फोटाची व पोटगीची चर्चा करणारी 'बंधमुक्ता' ही कांदबरी कमलाबाई बंबेवाले ह्यांनी लिहिली.

स्त्रियांच्या वैवाहिक समस्या, शिक्षण, अर्थार्जन, प्रौढ स्त्रियांचे प्रश्न, पतीचा छळ सहन करणारी स्त्री, बिजवर पुरुषाबरोबर विवाह, असे अनेक विषय हाताळून स्त्री विशिष्ट अनुभव कांदबऱ्यातून व्यक्त झालेले आढळतात. गीता साने– 'हिरवळीखाली', विभावरी शिरूरकर 'हिंदोळ्यावर', 'विरलेले स्वप्न', 'बळी', 'शबरी', प्रेमा कंटंक – 'काम आणि कामिनी', शकुंतला परांजपे– 'घराचा मालक', मालती दांडेकर – 'वज्रलेख', सुधा साठे 'पुसलेली चित्रे' या कादंबऱ्याचा उल्लेख करावा लागेल.

स्त्रियांचे कांदबरी लेखन हे स्त्री सुधारणेकडून स्त्री स्वातंत्र्याकडे विकसित होताना जाणवते. आजवर दडपून टाकलेली लैंगिक भावना स्वातंत्र्योत्तर काळातल्या लेखनात धीटपणे

व्यक्त होताना दिसते. या काळातील स्त्रियांचे अनुभवविश्व अधिक व्यापक व व्यामिश्र होताना दिसून येते. प्रत्येक क्षेत्रात पुरुषांसमेवत समानतेने वावरताना येणारे अनुभव हे आजवरच्या अनुभवापेक्षा वेगळे असेच होते. या काळात होणाऱ्या चळवळी सामाजिक राजकीय परिस्थिती, त्यावेळी लिहिले गेलेले वाङ्मय याचा एकत्रित परिणाम लेखिकांवर झाला. नवसाहित्यातील 'परामत्ता', 'रात्रदिंन आम्हा' आणि 'काळा सूर्य व हॅट घालणारी बाई' या कमल देसाई यांच्या कादंबऱ्यातून संज्ञाप्रवाही लेखन दिसून येते.

समान हक्क, शिक्षण, वेतन, या मूल्यांमुळे स्त्रियांमध्ये आत्मसन्मान जागृत होऊन त्या पुढचं पाऊल उचलत आहे. आपल्यावर होणाऱ्या अन्याय-अत्याचारविरुद्ध, स्त्री-पुरुष विषमतेविरुद्ध, जुन्या पुरुषप्रधान मूल्यांविरुद्ध ती आवाज उठवत आहे. याचे साद प्रतिसाद स्त्रीवादी लेखनातून उमटताना जाणवतात. 'त्रिदल' मधील मंजू- शारदा, 'स्थलांतर' मधील रिती-नंदू, 'आवर्तन' मधील रंजू-जानकी ह्या स्त्रियांमधील मैत्री नव्या नात्याचे रूप घेताना दिसते. स्त्री-पुरुष मैत्री आणि प्रेमाची विविध रूपं गौरी देशपांडे ह्यांच्या कादंबऱ्यातून प्रकट झालेली दिसतात त्यांच्या कादंबरीतून व्यक्त होणारी स्त्री आधुनिक असून तिच्या शारीरिक व मानसिक इच्छांची मोकळी मांडणी त्या कादंबरीतून व्यक्त होते.

स्वातंत्र्योत्तर काळातील लोकप्रिय लेखिका म्हणून कुसुम अभ्यंकर, नयना आचार्य, सुमती क्षेत्रमाडे, शैलजा राजे, शकुंतला गोगटे, योगिनी जोगळेकर, ज्योत्स्ना देवधर, मृणालिनी जोशी, कुमुदिनी रांगणेकर, लिला श्रीवास्तव, निर्मला देशपांडे आदींचा उल्लेख करावा लागेल.

**आत्मचरित्र :-**

स्त्रियांना सर्वात जवळचा वाटणारा वाङ्मय प्रकार म्हणजे आत्मचरित्र हा होय. त्यांनी तो आपल्या व्यथा, वेदना व आठवणी कथन करण्यासाठी हाताळला. तो त्यांच्या

जीवनाचा साक्षीदारच आहे. सन १९१० मध्ये रमाबाई रानडे– 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' हे पहिले आत्मचरित्र असले तर १९२८ मध्ये पार्वतीबाई आठवले यांचे 'माझी कहाणी' हे खऱ्या अर्थाने स्त्रीने स्वत:विषयी व आपल्या कर्तृत्वाविषयी लिहिलेलं पहिले आत्मचरित्र आहे.

लक्ष्मीबाई टिळक – 'स्मृतीचित्रे' १९३४, शांता आपटे – 'जाऊ मी सिनेमात' १९४०, आनंदीबाई कर्वे – 'माझे पुराण' १९४४, लीलाबाई पटवर्धन – 'आमची अकरा वर्षे' १९४५, लक्ष्मीबाई पटवर्धन – 'माझा नंदादीप' १९५२, गिरिजा केळकर – 'द्रौपदीची थाळी' १९५९, मृणालिनी देसाई – 'निशिगंध' १९६८, ज्योत्स्ना गोळे – 'स्वरवंदना' १९७७, आनंदीबाई शिर्के – 'सांजवात' १९७२, प्रमिला भालेराव यांचे 'अश्वत्थाची फुले' १९७२, हंसा वाडकर – 'सांगत्ये ऐका' १९७२, सरोजनी सारंगपाणी– 'दुर्देवाशी दोन हात' १९७५.

पतीनिष्ठा, पतीप्रेम या भावनांनी लिहिलेली आत्मचरित्रे प्रारंभीच्या काळात आढळतात. पतीची इच्छा म्हणून, लोकांचा आग्रह म्हणून कोणी सूचवले म्हणून, हौस म्हणून, दु:ख विसरण्यासाठी म्हणून पतीविषयीचे गैरसमज दूर व्हावेत म्हणून, आपल्या सहजीवनातील कृतार्थता व्यक्त करण्यासाठी म्हणून ही आत्मचरित्रे लिहिलेली आढळून येतात. लक्ष्मीबाई टिळक – 'स्मृतिचित्रे', गोदावरी परूळेकर– 'जेव्हा माणूस जागा होतो' ही वाचकांच्या पसंतीला उतरलेली आत्मचरित्रे आहेत.

'सांगत्ये ऐका' मधील हंसा वाडकर यांच्या जीवनातील अनुभव वाचताना वाचक विलक्षण अस्वस्थ होतो, आनंदीबाई विजापूरे यांच्या 'अजून चालतेची वाट' मधून एका बेधुंद आणि संवेदनक्षम प्रेयसीच्या मनाची तडफड व्यक्त होते, माधवी देसाई यांच्या 'नाच गं घुमा', या मधून स्त्रीच्या मनातील व जीवनातील असहाय्यतेचे दर्शन घडते, मलिका अमर शेख यांच्या 'मला उद्ध्वस्त व्हायचंय' या आत्मचरित्रातून त्या आपल्या स्वतंत्र अस्तित्त्वासाठी आणि आकांक्षेसाठी वेदना आणि विद्रोह व्यक्त करताना दिसतात. सुनीता देशपांडे यांचे 'आहे मनोहर तरी' यामधून प्रसिद्ध साहित्यिक असणाऱ्या पतीच्या नावाचा उपयोग न करता

स्वत:चे स्वतंत्र अस्तित्त्व निर्माण करणाऱ्या स्त्रीचे आत्मचरित्र आहे 'स्नेहांकिता' स्नेहप्रभा प्रधान, सिंधूताई सपकाळ– 'मी वनवासी' ही महत्त्वाची आत्मचरित्रे आहेत. तसेच 'रास' सुमा करंदीकर हे पतीने आपल्याबरोबर पुनर्विवाह करुन आपल्यावर खूप उपकार केले अशी भावना बाळगून त्यांच संसार करणाऱ्या स्त्रीचे आत्मचरित्र.

स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्रियांच्या आत्मचरित्रांमधून संसार, संगीत, सिनेमा, समाजसेवा, नृत्य आणि शिक्षण या क्षेत्रांतील स्त्रियांच्या अनुभवांचा ठसा वाचकांच्या मनावर उमटताना जाणवतो.

सन १९८१ मध्ये कुमुद पावडे यांचे 'अंत:स्फोट' हे दलित स्त्रीचे आत्मकथन म्हणून या पुस्तकाची विपूल चर्चा झाली. मालिका अमर शेख 'मला उद्ध्वस्त व्हायचंच' (१९८४) हे पती–पत्नीच्या नाजूक नात्यांची स्फोटक कहाणी जशी आहे तशी दलित समाज आणि चळवळीवर भेदक भाष्य करणारी हकिकतही आहे. १९८६ शांताबाई कांबळे– 'माज्या जन्माची चित्तरकथा', बेबी कांबळे याचे 'जीणं आमुचं' ही आत्मचरित्रे दलित स्त्रियांची वेदना व्यक्त करतात. १९९५ मध्ये नजूबाई गावित ह्यांचे 'आदोर' हे आदिवासी स्त्रीचे आत्मचरित्र प्रकाशित झाले त्यातून त्या स्त्रीच्या जीवनातील दैन्य आणि दारिद्र्याचे चित्रण केलेले दिसते.

अशाप्रकारे स्त्रियांनी स्वत: स्वतंत्रपणे जिवंत माणूस व व्यक्ती म्हणून जीवन जगून आपल्या खऱ्या अनुभवांचे चित्रण करण्यासाठी साहित्यातील विविध प्रकाराचा वापर केला आणि यातून आधुनिकता, प्रस्थापित विचाराळा, पद्धतीला आव्हान देत नवा विचार, नवी पद्धती, नव्या संकल्पना मांडल्या आहेत.

## स्त्रीवादी साहित्य समीक्षेचे स्वरुप :-

समाजातील स्त्रीची सद्य:स्थिती हाच स्त्रीवादी साहित्याचा आणि स्त्रीवादी समीक्षेचा उगम आहे. स्त्रीवादी साहित्य मार्क्ससिझम आणि दलित चळवळ यात बरेचसे साम्य आहे.

'विनाकारण एकाला प्रमुख स्थान व एकाला दुय्यम स्थान मिळणे ; ही या तिन्ही चळवळींची समान व्यथा आहे. मार्क्ससिझम ची वैचारिक बैठक आधी तयार झाली व मग कृतीला सुरुवात झाली. स्त्रीवादी समीक्षेला कुठलीही वैचारिक बैठक नाही. चळवळीच्या शोधाने Theory शोधली गेली.

स्त्रीवादी साहित्य आणि स्त्रीवादी समीक्षा यांचा स्त्रीमुक्ती चळवळीच्या अनेक अंगोपांगातील एक महत्त्वाचे साहित्यिक अंग म्हणून विचार करावा लागेल. सन १९७० नंतर पाश्चात्त्य देशांमध्ये स्त्रीवादी साहित्याचा विविध अंगानी अभ्यास सुरु झाला. पाश्चात्त्य देशांमध्ये स्त्रीवादी भूमिकेतून जितके विपूल आणि समग्रपणे लेखन झालेले आहे तितके ते मराठीत झालेले आढळत नाही. पण जे काही लिखाण मराठीत स्त्रियांनी केले त्यातून स्त्रीवादी भूमिका तितक्या प्रबळपणे व्यक्त होताना दिसत नाही. पण १९६० नंतर मराठीत जे स्त्रीवादी लिखाण झाले त्याची प्रेरणा मात्र भारतीय संस्कृतीला विरोध करण्यातून व त्याचबरोबर जागतिक पातळीवर स्त्री साहित्यचळवळीतून मिळालेली दिसून येते. सन १८५० पासून ते विसाव्या शतकाच्या सुरुवाती पर्यंत समतेचा पुरस्कार करणाऱ्या लेखनाबरोबर स्त्रीचे स्थान हे पुरुषांच्या तुलनेत दुय्यम का असते ? तसेच तिला माणूसपणाची वागणूक का मिळत नाही ? असे प्रश्न विचारणारे लेखन या कालखंडात काही वैचारिक विचारसरणीच्या सुधारणावादी पुरुषांकडून झाले तसेच ते काही स्त्री लेखिकांकडून ही झाले.

सन १९७५ नंतर स्त्रीमुक्ती चळवळीला वेग आला. स्त्रियांना स्वातंत्र्य मिळाले, मतदानाचा अधिकार मिळला. काही वारसादी हक्कांचे कायदे तिच्या बाजूने झाले. तरी या सुधारणा बाह्य स्वरुपाच्या आहेत आणि त्या ही तितक्याच आवश्यक आहेत. पण ज्यांचा उद्धार व्हावा असे वाटत आहे त्यांनीच स्वत: पुढाकार घेतल्याशिवाय हे होणे नाही. स्त्रियांना होणारी 'स्व' जाणीव, येणारे आत्मभान, स्वप्रतिष्ठेचे मूल्य आणि मुख्य म्हणजे आपले स्वत्त्व, आपली प्रतिष्ठा आपणच जपावी लागते याची जाणीव तिला झाली होती हे मात्र खरं. पती हा जीवनाचा, सुखदु:खाचा जोडीदार आहे; सत्ता गाजविणारा सत्ताधीश नाही, ही

नवी दृष्टी स्त्रीला प्राप्त झाली. झालेल्या या जाणीव जागृतीमुळे तिच्या मनात विचारांचा कल्लोळ उठला. तो कल्लोळ संमिश्र स्वरुपाचा होता. तिच्या काटेरी मार्गावर जणू फुलेच पसरलेल्याचा आनंद तिला झाला होता; सोसलेल्या वेदनांचा गहिवर होता ; त्याचबरोबर अंत:करणात उठणाऱ्या विद्रोहाच्या ठोक्यांचा आवाज होता ; आत्मभानाची नवी पहाट होती ; स्त्रीचा नैसर्गिक आशावाद होता. स्त्रीमनातील नवसंवेदनाची बिंब-प्रतिबिंबे ललित साहित्यात उमटण्यास सुरुवात झाली. आपले अनुभव, आनंद, वेदना, दु:ख, विद्रोह दर्शविण्यासाठी स्त्रियांनी साधन म्हणून लेखणी उचलली आणि साहित्याचे विविध प्रकार हाताळले. त्यातून स्त्रीमनाचा स्वतंत्र अविष्कार प्रकट झाला आणि खऱ्या अर्थाने इथेच स्त्रीवादी साहित्याची निर्मिती झाली.

डॉ. अश्विनी धोंगडे म्हणतात, 'स्त्रीवादी साहित्याची व्याख्या करणे तसे अवघड आहे. वाङ्मयाकडे पाहण्याचा स्त्रीकेंद्री दृष्टीकोन'[२८] अशी काम चलावू व्याख्या केली जाते. 'समाजातील रूढ पितृसत्ताक पद्धतीला वाङ्मयीन माध्यमातून दिलेला धक्का' अशी ही एक वर्णनात्मक व्याख्या केली जाते.

## फिमेल, फेमिनाईन आणि फेमिनिस्ट :-

स्त्रीवादी साहित्य समजावून घेताना 'फिमेल', 'फेमिनाईन' आणि 'फेमिनिस्ट' या शब्दांचे अर्थ नीटपणे समजून घेणे आवश्यक आहे.

अ) फिमेल (स्त्री) : केवळ स्त्रियांनी केलेलं लेखन

इ) फेमिनाईन (स्त्रीप्राधान्य) : पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेविरुद्ध राजकीय भूमिका न घेता स्त्रियांनी केलेलं लेखन.

उ) फेमिनिस्ट (स्त्रीवादी) : पुरुषसत्ताक समाजव्यवस्था आणि विचारप्रणालीविरुद्ध राजकीय भूमिकेने प्रेरित होऊन स्त्रियांनी केलेलं लेखन.

- केवळ स्त्री आहे म्हणून स्त्रीवादी साहित्य नव्हे.
- केवळ स्त्रियांनी लिहिलेले ते स्त्रीवादी साहित्य नव्हे.
- केवळ स्त्री केंद्रीत साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य नव्हे.

स्त्रीचा म्हणून खास अनुभव असलेले ते स्त्रीवादी आणि स्त्री ही स्त्री म्हणून आपले वेगळेपण मान्य करुन जेव्हा स्वत:च्या म्हणून जाणिवा व्यक्त करते ते स्त्रीवादी साहित्य.

इब्सेनचे 'डॉल्स हाऊस' असो वा ज्योती म्हापसेकरचे 'मुलगी झाली हो' हे असो या दोन्ही नाटकांनी स्त्री चळवळीला गती दिलेली जाणविते. पुरुषी वर्चस्वाला सर्व बाजूने हादरे देणे हे स्त्रीवादी साहित्याचे वैशिष्ट आहे. अनेकदा साहित्यामध्ये पुरुष लेखकांनी स्त्रियांचे अनुभव कल्पनेने मांडलेले दिसतात. त्यामध्ये कुठेही स्त्रीवाद व्यक्त झालेला दिसत नाही. स्त्रीचे म्हणून काही खास स्त्रीविशिष्ट अनुभवविश्व असते आणि ते जर पुरुषांनी ठेखनबद्ध करायचे ठरविले तर त्यामध्ये काल्पनिकता, अवास्तवता आणि अतिरंजिकता येण्याची शक्यता असते. पुरुषाला स्त्रीचे विशिष्ट अनुभव मांडता येणार नाहीत तसेच स्त्रीने स्वत:चे अनुभव लिहिल्याशिवाय खऱ्या स्त्रीची प्रतिमा समाजापुढे येणार नाही अशी भूमिका स्त्रीवादाची आहे. याच भूमिकेतून स्त्रीवादी समीक्षकांनी जुन्या वाङ्मयाचेही नव्याने पूनर्मूल्यांकन केलेले आढळते. एलेन शोवॉल्टर हिने 'ए लिटरेचर ऑफ देअर ओन' (१९७७) याग्रंथामध्ये 'एमिली ब्रांटे ते डोरिस लेसिंग' पर्यंतच्या ब्रिटीश लेखिकांच्या लेखनाची चिकित्सा करुन त्यामध्ये प्रकट होणारी पुरुषसत्ताकविरोधी आणि स्त्रीवादी भूमिका याचे विवेचन केलेले दिसते. पण समीक्षेसाठी लेखिकांच्या लिखाणाची निवड केल्याने राजकीयत्त्वाचे यथार्थ दर्शन घडते. समीक्षेला तिची एकवाक्यता मिळते, पण स्त्रीवादी समीक्षा पुरुषांची पुस्तकेही हाताळू शकते. केट मिलेटने आपल्या 'सेक्स्युअर पॉलिटिक्स' या पुस्तकात नॉर्मन मेलर, डी.एच. लॉरेन्स, हेन्री मिलर यांच्या साहित्याच्या मूळाशी असलेला लिंगवाद दाखवून दिला आहे. मेरी एलमानने आपल्या 'थिंकिंग अबाऊट वुईमेन' या पुस्तकात पुरुष समीक्षकांच्या लिंगवादी दृष्टीकोनाची चर्चा केली आहे. या लिंगवादाचा अभ्यास आपण या प्रकरणातील 'भाषिक पातळीवरील पुरुषी वर्चस्व' या मुद्यामध्ये पाहिलेला आहे.

बायकांनी जेव्हा स्वातंत्र्य उपभोगण्याचा विचार केला तेव्हा त्यांच्या पुढे पुरुष हाच आदर्श होता ; पण त्यांना नंतरच्या काळात असं जाणवून दिलं गेलं, की स्त्री आणि पुरुष यांच्या जीवनशैलीत मुळातच फरक आहे. निसर्गाने दोघांनाही वेगवेगळ्या शारीरिक ढाच्यात बनविले आहे आणि त्याचा संबंध उत्पत्तीशी जोडलेला आहे. स्त्रियांवर आलेल्या जैविक जबाबदाऱ्या मान्य करुन स्त्रीला आपले स्वातंत्र्य उपभोगता येऊ शकते. 'वुई आर इक्वल बट वुई आर डिफरन्ट' आमच्यातील फरक मान्य करुनही आम्ही समान आहोत, अशा वैचारिकपातळीपर्यंत ही चळवळ नजीकच्या काळात येऊन पोहचलेली दिसते. जिथे तर्क, बुद्धी संकल्पना, तात्विक विवेचकता या गोष्टी पुरुषी समजल्या जातात, अशा समाजाकडून जिथे या संकल्पनांना पुरुषी–बायकी असे लिंगाधारीत वैशिष्ट्य प्राप्त होत नाही अशा समाजाकडे ही वाटचाल आहे.

वरील सर्व विवेचनानुसार डॉ. अश्विनी धोंगडे यांनी समीक्षेसंबंधी तीन बैठकी मांडलेल्या आहेत.

अ) **फिमेल** – स्त्रीसमीक्षा लेखिकांचा अ–राजकीय (अ–पोलिटिकल) विचार. ही समीक्षा त्या लिखाणाच्या स्वरुपाचा विचार करत नाही. स्त्रीवादी न होता स्त्री–समीक्षक असणे ही भूमिका यात अंतर्भूत आहे.

इ) **फेमिनिन**– स्त्रियांवर वर्चस्व गाजविणाऱ्या पुरुषी समाजात दडपलेल्या, बाजूला टाकलेल्या, गप्प बसविल्या गेलेल्या पण विशिष्ट राजकीय भूमिका न घेतलेल्यांच्या वाङ्मयीन हुंकारांची समीक्षा.

उ) **फेमिनिस्ट**– पितृसत्ताक व लिंगवाद या विरुद्ध राजकीय भूमिका घेणाऱ्या साहित्याची समीक्षा.[२१]

सर्व प्रथम स्त्रीवादी साहित्यशास्त्राची रूपरेषा मांडण्याचे श्रेय 'एलेन शोवॉल्टर' हिला जाते. तर व्हर्जिनिया वुल्फचे 'अ रूम ऑफ वन्स ओन' हे पुस्तक म्हणजे स्त्रीनिष्ठ समीक्षेचा प्रारंभबिंदू मानले जाते. तिने साहित्याकडे पाहण्याची स्त्रीनिष्ठ दृष्टी दिली. परंतु सैद्धांतिक परिभाषेत तिने आपल्या विचारांची मांडणी केली. स्त्रीनिष्ठ साहित्यसमीक्षेची चौकट

घडविण्याचे श्रेय एलेन शोवॉल्टरला जाते. 'A Feminist criticism that is genuinely women-centered, independent and intellectuall coherent.'[३०] अशी स्त्रीनिष्ठ समीक्षेचे तिने केलेली व्याख्या महत्त्वपूर्ण आहे. तसेच 'फेमिनिस्ट क्रिटिसिझम इन द वाइल्डरनेस' या लेखात पुरुषांच्या अनुभवावर आधारलेल्या व म्हणून वैश्विक समजल्या जाणाऱ्या समीक्षेला 'ॲंड्रोसेंट्रिक' तर मार्क्स, फ्रॉईड, लँकन किंवा देरिका यांच्यातून योग्य दृष्टी उचलणाऱ्या स्त्रीवादी समीक्षेला तिने 'गायनोसेंट्रिक' अशी परिभाषा वापरली आहे आणि 'टुवर्ड अ फेमिन्सट पोएटिक्स' या निबंधात त्याच्या ही पुढे जाऊन ती 'गायनोसेंट्रिक' या स्त्रीकेंद्री समीक्षेची दोन विभागात विभागणी करते.

**१. फेमिनाईन क्रिटिक (स्त्रीप्रधान समीक्षा) :-**

पुरुषप्रधान संस्कृतीने, पुरुषसत्ताक समाजाने आखून दिलेल्या चौकटीत राहून स्त्रियांनी आपला आशय आणि आविष्कार बसविला आहे, पुरुषनिर्मित साहित्यातून स्त्रीची परंपरागत, सांकेतिक प्रतिमा प्रकटलेली आहे. अशाच पारंपारिक साहित्याचे वाचन ही समीक्षा करते. तसेच पुरुषानुगामी साहित्याचे स्त्रीवादी वाचन ही या समीक्षेची एक नवी दिशा आहे.

स्त्रियांचे लिखाण हे बऱ्याच वेळा दुर्लक्षित झालेले दिसते. पुरुष समीक्षकांनी स्त्रियांच्या लेंखनाकडे पाठ फिरविलेली असल्यामुळे स्त्रीवादी समीक्षक असे दुर्लक्षित स्त्रियांचे साहित्य वाचून त्याची पूनर्मांडणी करत असतो. या स्त्रीनिष्ठ समीक्षेने, 'स्त्री–वाचकाला' आपल्या स्वत:च्या दृष्टीकोनातून कोणत्याही संहितेचे वाचन आणि पितृसत्ताक व्यवस्थेतून निर्माण झालेल्या साहित्याचे पूनर्वाचन करण्याचा हक्क आहे, ही महत्त्वाची भूमिका घेतलेली आहे, असे दिसून येते.

२. गायनोक्रिटिक :-

या समीक्षेची भूमिका स्त्री केंद्र विश्लेषण करणारी असून यात स्त्रियांचे अनुभव हे तिच्या शरीरधर्मामुळे पुरुषांच्या अनुभवांपेक्षा भिन्न स्वरुपाचे आहेत. स्त्रीचे हे खास स्त्रीविशिष्ट अनुभवविश्व जैविक, भाषिक आणि मानसिक या स्तरांवर स्वतंत्र होत असते. याच स्त्रीविशिष्ट अनुभवविश्वाला एलेन शोवॉल्टर 'वाईल्ड झोन' असे संबोधते. स्त्रीच्या शरीरनिष्ठ अनुभवांना प्राधान्य देऊन तिच्या लेखनाची समीक्षा करणार समीक्षक हा गायनोक्रिटिक प्रकारात मोडतो.

स्त्रीवादी साहित्याची व्याख्या करताना डॉ. उषाताई शिंदे म्हणतात, 'पुरुषसत्ताक चौकटीतून मुक्त होऊन स्त्रीत्त्वाच्या अस्मितेचा अनुभव संघटित करणे, हे ध्येय ठेवून लिहिलेले साहित्य हे 'स्त्रीकेंद्री' साहित्य ठरेल. निखळ 'स्त्रीनिष्ठ अनुभव मांडणारे साहित्य हे 'स्त्रीकेंद्री' साहित्य म्हणून ओळखले जावे आणि स्त्री स्वातंत्र्याच्या राजकीय लढाईचा भाग म्हणून जे स्त्री साहित्य अवतरेल त्याला स्त्रीवादी साहित्य असे संबोधण्यात यावे.'[३१] तर डॉ. अश्विनी धोंगडे यांनीही 'पितृसत्ता व लिंगवाद याविरूद्ध राजकीय भूमिका घेणाऱ्या साहित्याची समीक्षा म्हणून 'Feminist Criticism' ही संज्ञा उपयोजिलेली दिसते.'[३२]

# * संदर्भसूची *


१. 'स्त्री' मासिक, संपा. लेले विजय, मार्च २०१० पृष्ठ – ६.

२. 'डायमंड सामाजिक ज्ञानकोश, खंड १ ला', संपा.– जोशी बी.आर, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे. प्रथम आवृत्ती – २००७. पृष्ठ – २४.

३. 'स्त्री विरुद्ध पुरुष', गोर्ले शिवराज, रावळेकर जयश्री, राजहंस प्रकाशन, पुणे. प्रथम आवृत्ती – २००७. पृष्ठ – २७०.

४. संपा. लेले, पृष्ठ – २३.

५. तत्रैव, पृष्ठ – २३.

६. 'अबला होई प्रबला', लिमये चंपा. श्री विद्या प्रकाशन, पुणे. प्रथम आवृत्ती – १९८८. पृष्ठ – १०४.

७. गोर्ले शिवराज, पृष्ठ – ६.

८. 'स्त्रीवादी समीक्षा स्वरूप आणि उपयोजन', डॉ. धोंगडे अश्विनी, दिलीपराज प्रकाशन, प्रा. लि. पुणे. प्रथम आवृत्ती –१९९३. पृष्ठ – ६.

९. समीक्षेतील नव्या संकल्पना, संपा. जाधव मनोहर, प्रथम आवृत्ती – २००८. पृष्ठ – १३४.

१०. 'A New Approach Dictionary of Living English' Editor Sohoni S.V., Nitin Prakashan, Pune, Second Education Reprinted 1993. पृष्ठ – ५२५.

११. धोंगडे अश्विनी, पृष्ठ – ३६.

१२. तत्रैव, पृष्ठ – १२.

१३. 'भारतांतील थोर स्त्रिया', संपा. दांडेकर शं.वा. प्रथम आवृत्ती. १९६३. पृष्ठ – २०.

१४. तत्रैव, पृष्ठ – २१.

१५. 'ताराबाई शिंदे लिखित – स्त्री–पुरुष तुलना', संपा. खोले विलास, प्रतिमा प्रकाशन, पुणे. प्रथम आवृत्ती – १९९७, पृष्ठ – २६.

१६. संपा. जाधव मनोहर, पृष्ठ – १४९.

१७. 'स्त्री विकासाचे नवे क्षितिज', संपा. कर्वे स्वाती, प्रतिभा प्रकाशन पुणे. पृष्ठ – ४४.

१८. 'स्त्रियांची आत्मचरित्रे : स्त्रीवादी शोध', डॉ. पाटील शोभा, मल्हार प्रकाशन, पुणे. प्रथम आवृत्ती – २००२. पृष्ठ – ६२.

१९. उनि, पृष्ठ – ५३–५४.

२०. तत्रैव, पृष्ठ – ५५.

२१. तत्रैव, पृष्ठ – ५५.

२२. 'मायवाटेचा मागोवा, भवाळकर तारा,' शब्दालय प्रकाशन प्रथम आवृत्ती – १९९८. पृष्ठ –२७.

२३. तत्रैव, पृष्ठ – २७.

२४. तत्रैव, पृष्ठ – २८

२५. वरखेडे मंगला, पृष्ठ – १४३.

२६. 'मराठी लेखिका : चिंता आणि चिंतन, फडके भालचंद्र, श्री विद्या प्रकाशन, पुणे. प्रथम आवृत्ती – १९८०. पृष्ठ – १३०.

२७. तत्रैव, पृष्ठ – १३०.

२८. धोंगडे अश्विनी, पृष्ठ – ५१.

२९. तत्रैव, पृष्ठ – ५१.

३०. डॉ. पाटील शोभा, पृष्ठ – ३९.

३१. तत्रैव, पृष्ठ – ४३.

३२. तत्रैव, पृष्ठ – ४३.